आपला आवाज आपली शक्ती

# जनशक्ति

जळगाव येथून प्रकाशित होणारे निष्पक्ष, निर्भीड दैनिक

epaper.janashakti.in » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ » वर्ष : ७२ » अंक : २९२ बुधवार, २ जुलै २०२५ » जळगाव/नाशिक/धुळे/नंदुरबार » पाने ६ » किंमत : २ रुपये

**सुविचार**

यश मिळवण्यासाठी कधीही शॉर्टकट नसतो, कठोर मेहनतच त्याचा मार्ग असतो.

- स्वामी विवेकानंद

**अंतरंग**


- **जळगाव जिल्हा** - पाचोरा पिपल्स बँक निवडणुकीत...
- **दृष्टीकोन** - मराठी बाण्याचा हिसका
- **जीवनशक्ती** - इंजिनिअर व्हायचंय?
- **जनशक्ति विशेष** - तलावांत ४० टक्के जलसाठा


## शॉर्ट न्यूज

### धरणात बुडालेल्या तरुणाचा मृतदेह तिसऱ्या दिवशी काढला

**जळगाव ।** यावल तालुक्यातील सावखेडा सीम जवळील निंबादेवी धरणात बुडून बेपत्ता झालेल्या जळगाव येथील तरुणाचा मृतदेह अखेर तिसऱ्या दिवशी शोधमोहिमेत सापडला आहे. रामेश्वर कॉलनी, जळगाव येथील जतीन अतुल वार्डे (वय १८) असे या मृत तरुणाचे नाव आहे.ही दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी घडली होती. जळगाव येथील रामेश्वर कॉलनी भागातील आठ तरुण सुट्टी असल्याने निंबादेवी धरणावर फिरायला आले होते. काही तरुण धरणातील पाण्यात अंघोळीसाठी उतरले. मात्र, जतीन वार्डे अचानक खोल पाण्यात बुडाला. त्याला वाचवण्याचा इतर तरुणांनी प्रयत्न केला, पण कुणालाही पोहता येत नसल्याने ते खोल पाण्यात जाऊ शकले नाहीत.

### मनपाचा आकृतीबंध लवकरच मंजूर करणार

**मुंबई ।** राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांचे आकृतीबंद मंजूर करण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात येईल असे, मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य चित्रा वाघ यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सत्यजीत तांबे, मनीषा कायंदे, अमोल मिटकरी, अमित गोरखे, योगेश टिळेकर, जा. मो. अभ्यंकर यांनी सहभाग घेतला. कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा अभ्यास करून योग्य निर्णय घेण्यात येईल,असेही त्यांनी सांगितले.

# मोदी तुमचे बाप असतील, शेतकऱ्यांचे नाही !

## अधिवेशनात काँग्रेसचे आमदार नाना पटोलेंचा संताप, मुख्यमंत्र्यांनी माफी मागण्याचा धरला आग्रह

। मुंबई ।

**काँग्रेसचे** आमदार नाना पटोले यांना एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही कारवाई केली. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विधानाचा मुद्दा नाना पटोलेंनी विधानसभेत उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई केली. विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर दुसऱ्या विषयाचे काम सुरू झाले असताना नाना पटोले यांनी बबनराव लोणीकर आणि कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या विधानांमुळे संताप व्यक्त केला. मोदी तुमचे बाप असतील, राज्यातील शेतकऱ्यांचे नव्हे, असे म्हणत पटोले सभागृहात संतापले. माणिकराव कोकाटे आणि बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विधानांबद्दल मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी नाना पटोले यांनी केली. त्यावरून प्रचंड गदारोळ सभागृहात झाला. त्यामुळे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करावे लागले.



### शेतकऱ्यांविरोधात विधानाचे सरकारकडून समर्थन?

**राज्यात** आज शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन चालू आहे. बारा जिल्ह्यातील शेतकरी या महामार्गाला विरोध करत आहे, दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात, सत्ताधारी आमदार बबनराव लोणीकर शेतकरी आमच्या पैशावर जगतात अशी उपकाराची भाषा करतात. लोणीकर यांच्यावर कारवाई होत नाही. यावरून अशी विधाने करणाऱ्यांचे सरकार समर्थन करत आहे का? असा सवाल काँग्रेस विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

### सभागृहात विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न

**शेतकऱ्यांच्या** विषयावर विरोधकांना सभागृहात बोलू दिले जात नाही, निलंबन केले जाते. शेतकऱ्यांच्या विषयावर आंदोलन करू, तुरुंगात टाकले तरी चालेल पण शेतकऱ्यांसाठी आम्ही लढत राहू, अशी आक्रमक भूमिका विजय वडेट्टीवार यांनी घेतली. महाविकास आघाडीच्या नेत्यांना सभागृहात बोलूच दिले जात नाही, उलट शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलल्यावर कारवाई करण्यात येते, असा आरोप विरोधकांनी केला. यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. विरोधकांनी पूर्ण दिवसाच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला.

### पटोले अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले

**कामकाज** सुरू झाल्यानंतर विरोधकांनी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी लावून धरली. नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार हे त्यांच्या आसनावरून उठून विधानसभा अध्यक्षांच्या आसनापर्यंत गेले. नाना पटोलेंनी राजदंडालाही हात लावला. अध्यक्षांच्या समोर उभे राहून माफीची मागणी केली. त्यानंतर सत्ताधारी चांगलेच आक्रमक झाले. दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस आणि सत्ताधारी मंत्री, आमदार आक्रमक झाले. विधानसभा अध्यक्ष राहिलेल्या माणसाने विधानसभा अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे बरोबर नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. विरोधकांचा गोंधळ वाढल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांना एका दिवसासाठी निलंबित केले. मात्र, विरोधी पक्षातील आमदार माफी मागण्याच्या मुद्द्यावर आक्रमक झाले. घोषणा दिल्या. त्यामुळे काही काळ गोंधळ सुरू होता. त्यानंतर विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार टाकला.

### सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले, गोर : जयंत पाटलांची टीका

**राज्याचे** अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटीच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला पहिल्या दिवशी धारेवर धरले आहे. राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे, सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे, त्यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे, अशी टीका त्यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केला असा मी उल्लेख केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्रांनी पुन्हा पुरवणी मागण्या मांडल्या, त्या ५७ हजार ५०९ कोटीच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्याने या पुरवणी मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या आणि आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक नवा विक्रम रचला आहे, असे ते म्हणाले.

पुरवणी मागण्या समोर मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असे या सरकारचे सुरू आहे. यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. पुढचा अर्थसंकल्प मांडण्याच्या आधी एक पुरवणी मागणी येणार. म्हणजे राज्याची महसूली तूट हे सरकार दीड किंवा दोन लाख कोटींपर्यंत पोहोचवतील. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. नाहीतर ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. म्हणून सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची निवड !



। मुंबई ।

**खूप** दिवस चर्चा सुरु असलेल्या महाराष्ट्राच्या भाजपा प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रविंद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. सध्या ते महाराष्ट्र भाजपचे कार्याध्यक्ष म्हणून काम करत होते. मंगळवारी मुंबई येथे आता प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची निवड करण्यात आली. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चव्हाण सूत्रे स्वीकारली आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आषिश शेलार, विनोद तावडे यासह भाजपाचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. मुंबईतील वरळी डोममध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. विधानसभा निवडणूकीनंतर मंत्रिमंडळात संधी न मिळाल्याने काहीसा नाराज असलेल्या चव्हाण यांना पक्षश्रेष्ठींनी दिलेले प्रदेशाध्यक्षपदाचे आश्वासन पूर्ण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने कोकण आणि इतर भागांत पक्षविस्तारावर भर देण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कोकणात पक्षवाढीसाठी चव्हाण यांच्या योगदानाचे कौतुक केले होते.

विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे राज्याचे महसूल मंत्री झाल्याने प्रदेश भाजपच्या अध्यक्षपदासाठी रविंद्र चव्हाण यांचे नाव जवळपास निश्चित झाले होते. ते डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. जानेवारी २०२५ मध्ये त्यांच्याकडे राज्याच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली.

# जळगाव : विद्यापीठ, महाराष्ट्र शासन, उद्योजक यांच्यात ९ सामंजस्य करार

। जळगाव प्रतिनिधी ।

**कवयित्री** बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्र शासन व विविध उद्योग व्यावसायिक संस्थांबरोबर ९ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. २७ जून रोजी कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सल्लागार परिषदेचे अध्यक्ष अशोक जैन होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी कुलगुरु प्रा. डॉ. आर.एस. माळी, प्रा. डॉ. के.बी. पाटील, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. भरत अमळकर, प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे आणि कुलसचिव डॉ. विनोद पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

या करारांतर्गत बी.कॉम रिटेल मॅनेजमेंट, बीएससी अप्लाइड बायोलॉजी, बीए ह्युमेनिटीज अँड सिव्हिल सर्व्हिसेस हे तीन अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम, एम.ए. ट्रायबल अकॅडमी आणि पी.जी. डिप्लोमा इन एनजीओ मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली.

कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच रोजगाराच्या संधी मिळतील. उद्योग क्षेत्राचा उत्तम प्रतिसाद लाभल्याचे त्यांनी नमूद केले. माजी कुलगुरु प्रा. माळी यांनी या अभ्यासक्रमांमुळे उच्च शिक्षणात विद्यार्थी सहभाग वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. प्रा. के.बी. पाटील यांनी या नविन अभ्यासक्रमांनी विद्यार्थ्यांना उत्तम संधी उपलब्ध होतील, असे मत मांडले. अनिकेत पाटील (जळगाव पिपल्स बँक) यांनी अभ्यासक्रम संस्था व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.

अशोक जैन यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, अवघ्या तीन महिन्यांत संवाद साधून अभ्यासक्रम विकसित करणे व अंमलबजावणी करणे कौतुकास्पद आहे. त्यांनी केळीच्या टिश्यू कल्चरवर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला व पूर्ण सहकार्याची हमी दिली.

प्रारंभी करारावर स्वाक्षऱ्या कुलसचिव डॉ. विनोद पाटील व नवजीवन प्लस सुपर शॉपचे संचालक अनिल कांकरीया यांनी केल्या. करार हस्तांतरणासाठी उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे,



जैन इरिगेशनचे श्री. भट व डॉ. के.बी. पाटील, नॅचरुली युवर्स बायोटेकचे निलेश तेली, दीपक मेडिकलचे दीपक पाटील, मुंबईचे प्रदीप थेंगडे, बीआयएएफच्या पूनम पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. राजेश जवळेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विनोद पाटील यांनी आभार मानले. विद्यापीठाचे विविध परिषद सदस्य, अधिकारी, शिक्षक आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धुळ्याचे माजी आमदार कुणाल पाटील यांचा भाजपात प्रवेश

। मुंबई ।



**धुळे** ग्रामीणचे काँग्रेसचे माजी आमदार कुणाल पाटील यांनी मंगळवारी (दि.१) आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते. पाटील यांचा भाजप प्रवेश हा धुळे जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे. धुळे येथील पाटील घराणे ७० वर्षांपासून काँग्रेसशी एकनिष्ठ होते. कुणाल पाटील यांचे आजोबा काँग्रेसचे खासदार होते. तर दिवंगत वडील रोहीदास पाटील यांनी अनेक खात्यांचे मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

# नैसर्गिक आपत्ती : पंचनामे पूर्ण होताच मदतीचे वाटप : मंत्री मकरंद जाधव



मुंबई । राज्यात मार्च-एप्रिलमध्ये काही जिल्ह्यांत, तर मे महिन्यात उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण विभागात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या असून, पंचनामे पूर्ण होताच शासनाच्या धोरणानुसार मदतीचे वाटप करण्यात येईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधान परिषद सदस्य सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, सतेज पाटील यांनी राज्यात अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि वीज पडण्याच्या घटनांमुळे झालेल्या शेतीपिकांच्या आणि जनजीवनाच्या नुकसानीबाबत मदतीचे वाटप करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

यावर उत्तर देताना मंत्री जाधव-पाटील म्हणाले की, राज्यात वीज पडून ६३ जणांचा मृत्यू झाला असून त्यांच्या कुटुंबियांना शासनाने प्रत्येकी ४ लाखांची मदत जाहीर केली आहे. ज्यांना अद्याप मदत मिळाली नाही त्यांना दोन दिवसांत ती देण्यात येणार असल्याचे मंत्री जाधव-पाटील यांनी यावेळी सांगितले.

शेती पिकांच्या नुकसानीबाबत बोलताना मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले की, एकूण ७५,३५५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून १,६८,७५० शेतकरी प्रभावित झाले आहेत. यासाठी सुमारे २१३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई अपेक्षित आहे. ओल्या दुष्काळासंदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, २४ तासांत ६५ मिमी पेक्षा अधिक अतिवृष्टी अथवा सलग पाच दिवस १० मिमी पेक्षा अधिक पावसाच्या घटनांवर शासन निर्णयानुसारच ओला दुष्काळ घोषित केला जातो. सध्या ८ जून २०२५ पर्यंतचे पंचनामे सुरू असून, त्यानंतर संबंधित मदतीचा निर्णय घेण्यात येईल. घरांच्या पडझडीच्या मदतीसाठी विभागवार निधी वितरित करण्यात आला असून, कोकण, नाशिक आणि अमरावती विभागांना प्रत्येकी ५ कोटी, पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागांना प्रत्येकी १२ कोटी, तर नागपूरला १० कोटी रुपये वितरित करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मंत्री जाधव-पाटील यांनी आवाहन केले की, जर कोणतीही मदत प्रलंबित असेल किंवा वितरणात अडचण असेल, तर ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडे देऊन, आवश्यक ती मदत तत्काळ दिली जाईल.

# जळगाव : जि. प. सीईओंचा दौरा, कर्मचारी गैरहजर, कारवाईचे निर्देश

। जळगाव प्रतिनिधी ।

**जिल्हा** परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी अलीकडे पाचोरा, भडगाव व जळगाव तालुक्यांचा दौरा करून विविध शासकीय कार्यालयांना अचानक भेटी दिल्या. या पाहणी दौऱ्यात अनेक ठिकाणी कर्मचारी गैरहजर आढळून आले. त्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली असून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाईचे निर्देश दिले आहेत.

शिरसोली येथील आरोग्य उपकेंद्रात पाहणी दरम्यान आरोग्य सेविका व मदतनीस हे दोघेही अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. संबंधित कर्मचाऱ्यांकडून खुलासा मागवण्यात आला असून, त्यांचे एक दिवसाचे वेतन थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




**तसेच,** पाथरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या भेटीदरम्यान एका शिक्षकाने कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गैरहजेरी लावल्याचे आढळले. याबाबत संबंधित शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्याचेही एक दिवसाचे वेतन रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या दौऱ्यात करनवाल यांनी पाचोरा तालुक्यातील लसगाव येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता आणि शालेय सुविधा यांची माहिती घेतली. त्यानंतर बांबूरुड येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची पाहणी करताना तेथील औषध साठा, कर्मचारी उपस्थिती आणि सुविधा यांचा आढावा घेतला. दौऱ्याच्या अखेरीस सीईओ करनवाल यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेळेचे भान ठेवण्याचे, नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचे आणि प्रशासनात शिस्त व कार्यक्षमतेचा अवलंब करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

# आषाढी एकादशीला सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन

## राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांची माहिती

। मुंबई ।

**भू**वैकुंठ असलेल्या पंढरपुरात आषाढी एकादशीच्या दिवशी लाखो वारकरी येतात. वारकऱ्यांना पंढरपूरपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळानेकडून अधिक बस चालवल्या जाणार आहेत. त्याचबरोबर आषाढी एकादशी निमित्ताने राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पंढरपूरला बसेस घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था असणार आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५,२०० बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक, अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



**सरनाईक** म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात यंदा स्वखर्चाने सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुरायाची सेवा करण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम राबविणार आहे, असे सरनाईक यांनी सांगितले. आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

### आरक्षण करणाऱ्यांना १५ टक्के सवलत

**एसटी** महामंडळाने लांब आणि मध्यम अंतरावरील प्रवासासाठी आधीच आरक्षण करणाऱ्यांना दिलासा दिला आहे. एसटीने आधीच आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना १५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्यांना ही सवलत नसणार आहे. ही योजना १ जुलैपासून सुरू करण्यात आली असून, पुढील वर्षभर राहणार आहे.



/ सुरेश वांदिले
करिअर कन्सेप्ट

# इंजिनिअर व्हायचंय?

## अशी असते अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया

**अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया २८ जूनपासून सुरू झाली असून, अर्ज ९ जुलैपर्यंत ऑनलाइन करता येतील. राज्यातील विद्यापीठांत ७० टक्के जागा स्थानिक विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत. शासकीय, खासगी आणि अल्पसंख्यांक संस्थांसाठी स्वतंत्र कोटा असून, आरक्षण योजनाही आहेत. दिव्यांग, अनाथ, महिला, संरक्षण दलातील विद्यार्थ्यांसाठीही सवलती आहेत. सीईटीसाठी नोंदणीकृत विद्यार्थ्यांना शुल्क माफ आहे. प्रवेश प्रक्रियेची पारदर्शकता राखली असून, हेल्पलाइन व संकेतस्थळाद्वारे मार्गदर्शन दिले जाते.**



पालक आणि विद्यार्थी, ज्या अभियांत्रिकी प्रवेश प्रकियेची आतुरतेने वाट बघत होते, ती २८ जून २०२५ पासून सुरू झाली आहे. नोंदणी करण्याची शेवटची तारीख ९ जुलै २०२५ आहे. ही नोंदणी ऑनलाइन पद्धती (इ-स्कुटुनी) ने कुठूनही करता येते. सर्व कागदपत्रेही या पद्धतीने अपलोड करता येतात. अर्जाची तपासणी व इतर सर्व बाबी ऑनलाइनच होतात. त्यामुळे विद्यार्थी व पालकांचा बराच त्रास आणि वेळ वाचू शकतो. ज्यांना प्रत्यक्ष अर्ज व कागदपत्रे सादर करायची आहेत, त्यांच्यासाठी विशेष केंद्रे उघडण्यात आली आहेत. सीईटी परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना, या प्रवेश प्रकियेच्या वेळी कोणतेही शुल्क भरावे लागत नाही; मात्र जेईई-मेन आणि नीट परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी सीईटीसाठी नोंदणी केली नसल्यास, त्यांना शुल्क भरावे लागेल.

ही सगळी प्रकिया, अतिशय सुटसुटीत, सोपी, पारदर्शक आणि सहज आहे. माहिती पुस्तिकेत सर्व सूचना स्पष्टपणे दिल्या आहेत. त्यानुसार अर्ज भरल्यास कुणाचीही मदत घेण्याची गरज भासत नाही. मात्र ज्या विद्यार्थी/पालकांना इतर कुणाची (मोबदला/विनामोबदला) मदत घ्यायची असल्यास, त्यांनीसुद्धा, ही सगळी नियमावली डोळ्याखालून घालणे आवश्यक आहे. १२ वीमध्ये इंग्रजी, गणित आणि विज्ञान विषय अभ्यासलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रकियेचे नियम समजून घेणे अजिबातच कठीण नाही. या प्रवेश प्रकियेत समाविष्ट करण्यात आलेल्या महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत-

### ■ गृह विद्यापीठ

या सामाईक प्रवेश प्रक्रियेमध्ये गृह (होम) विद्यापीठाला महत्त्वाचे स्थान असते. या विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय अस्वायत्त (नॉन ऑटोनॉमस) आणि विद्यापीठांतर्गत येणारे विभाग (युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट)- अभियांत्रिकी महाविद्यालयातील ७० टक्के जागा या गृहविद्यापीठ प्रवर्गातील असतात. याचा अर्थ असा की, या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या महाविद्यालयांमधून १२वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते.

### ■ गृहविद्यापीठ आणि त्या अंतर्गत येणारे जिल्हे-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ - (जिल्हे- छ. संभाजी नगर औरंगाबाद, बीड, जालना, धाराशिव), (२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - (जिल्हे- हिंगोली, लातूर, नांदेड, परभणी), (३) मुंबई विद्यापीठ- (जिल्हे- मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, रायगड, पालघर, सिंधुदुर्ग, ठाणे), (४) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर- (जिल्हे - कोल्हापूर, सांगली, सातारा), (५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ- (जिल्हे- पुणे, नासिक, अहमदनगर), (६) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - (जिल्हे- जळगाव, धुळे, नंदुरबार), (७) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर- (जिल्हा- सोलापूर), (८) गोंडवाना विद्यापीठ - (जिल्हे- चंद्रपूर, गडचिरोली), (९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ - (जिल्हे- भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा) (१०) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ- (जिल्हे- अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ)

### ■ शासकीय संस्थांमधील प्रवेश

● (अ) शासकीय संस्था, शासन अनुदानित स्वायत्त (राज्यस्तरीय) संस्था, एसएनडीटी - १०० टक्के जागा राज्यस्तरीय. (ब) विद्यापीठांचे विभाग, अस्वायत्त शासकीय व शासन अनुदानित अस्वायत्त संस्था- ७० टक्के जागा गृहविद्यापीठ, ३० टक्के जागा, गृहविद्यापीठाच्या व्यतिरिक्त असणारे राज्यातील इतर विद्यापीठे. अ आणि ब गटातील संस्थांमध्ये अखिल भारतीय प्रवेश कोटा, संस्थेचा कोटा आणि अल्पसंख्यांक कोटा नाही.

● इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई आणि लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी नागपूर - ७० टक्के जागा राज्यस्तरीय, ३० टक्के जागा अखिल भारतीय कोट्यातून भरल्या जातात. या संस्थेत व्यवस्थापन कोटा आणि अल्पसंख्यांक कोटा नाही.

● डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ, लोणेरे - ८५ टक्के जागा राज्यस्तरीय आहेत. १५ टक्के जागा कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांसाठी राखीव आहेत. या संस्थेत अखिल भारतीय प्रवेश कोटा, व्यवस्थापन कोटा आणि अल्पसंख्यांक कोटा नाही.

● शासकीय/अनुदानित शासकीय - अल्पसंख्यांक महाविद्यालये - (स्वायत्त) संस्थेतील ५० टक्के जागा राज्यस्तरीय आहेत. अशा संस्थेतील ३५ टक्के जागा गृह विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांसाठी आणि १५ टक्के जागा इतर विद्यापीठांसाठी राखीव असतात. या संस्थांमधील ५० टक्के जागा अल्पसंख्यांकांसाठी राखीव आहेत.

● कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, पुणे-८० टक्के जागा राज्यस्तरीय, २० टक्के जागा अखिल भारतीय कोट्यातून भरल्या जातात. या संस्थेत व्यवस्थापन कोटा आणि अल्पसंख्यांक कोटा नाही.

### ■ अशासकीय संस्थांमधील प्रवेश

● विनाअनुदानित खासगी व्यावसायिक/प्रायव्हेट प्रोफेशनल संस्था- (अल्पसंख्यांक संस्था वगळून) - (अ) स्वायत्त संस्था - ६५ टक्के जागा राज्यस्तरीय, (ब) अस्वायत्त संस्था- ४५.५ टक्के जागा गृह विद्यापीठ, १९.५ टक्के जागा इतर विद्यापीठ. अ आणि ब गटासाठी - अखिल भारतीय कोट्यातील जागा- १५ टक्के, संस्थेच्या कोट्यातील जागा - २० टक्के. अल्पसंख्यांक कोटा नाही.

● विनाअनुदानित अल्पसंख्यांक संस्था - (अ) स्वायत्त संस्था- १०० टक्के जागा राज्यस्तरीय, (ब) अस्वायत्त संस्था- ७० टक्के जागा गृह विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी आणि ३० टक्के जागा इतर विद्यापीठांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी.

अखिल भारतीय कोट्यासाठी जॉइंट एन्ट्रस एक्झामिनेशन (जेईई-मेन) या परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जातात.

### ■ ट्युशन फी वेव्हर स्किम (शिक्षण शुल्क माफ योजना)

प्रत्येक शाखेतील अभ्यासक्रमासाठी, काही अटी-शर्तीसह, ५ टक्के अतिरिक्त जागा आरक्षित ठेवल्या जातात. या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत संस्था किंवा अभ्यासक्रमात बदल करून दिला जात नाही. या योजनेचा लाभ पहिल्या वर्षाच्या अभियांत्रिकी, फार्मसी, डिझाइन, प्लॅनिंग, हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दिला जातो. या योजनेचा लाभ केवळ महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनाच मिळेल. या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे.

### ■ इतर मुद्दे

● संरक्षण दलातील पालकांच्या मुलांसाठी पाच टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. त्यासाठी पुढील तीन प्रकार करण्यात आले आहेत- (१) डिफेन्स एक- महाराष्ट्राचे अधिवासी (डोमेसाईल) असलेले माजी सैनिक, (२) डिफेन्स दोन- सध्या संरक्षण दलात कार्यरत महाराष्ट्राचे अधिवासी असणारे जवान/अधिकारी. (३) डिफेन्स तीन- महाराष्ट्राचे अधिवासी नसलेल्या पण सध्या महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या जवान/अधिकारी यांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ मिळू शकतो किंवा महाराष्ट्राचे अधिवासी नसणाऱ्या व सध्या त्यांच्या बदलीमुळे इतरत्र कार्यरत असणाऱ्या जवान/अधिकाऱ्यांचे पाल्यही या योजनेचा लाभ घेऊ शकतात; मात्र अशा संबंधितांचे कुटुंबीय, पाल्याच्या शिक्षणासाठी नियमानुसार महाराष्ट्रात राहणारे असावे. त्यांच्या पाल्याने १२ वी(एचएससी)ची परीक्षा महाराष्ट्रातील शाळा/महाविद्यालयातून देणे आणि उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या तिन्ही प्रकारातील उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी तयार केली जाते. यासाठी विशेष प्रमाणपत्र सादर करावे लागेल. या योजनेचा लाभ भारतीय लष्करी सेवेतील नागरी (सिव्हिलियन स्टाफ) कर्तव्य पार पाडणाऱ्या किंवा पार पाडलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना दिला जात नाही.

● पाच टक्के जागा दिव्यांगांसाठी राखीव असून, त्यासाठी २१ प्रकारचे अपंगत्व अधोरेखित करण्यात आले आहेत. या संवर्गाचा फायदा घेण्यासाठी उमेदवारास, किमान ४० टक्के अपंगत्व असून ते कायमस्वरूपी असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. या योजनेचा लाभ केवळ महाराष्ट्राचे अधिवासी असणाऱ्या उमेदवारांना, गृहविद्यापीठ/राज्यस्तरीय जागेसाठी दिला जातो. अनाथ उमेदवारांसाठी एक टक्का जागा राखीव आहेत. याचा लाभ अल्पसंख्यांक संस्था आणि अखिल भारतीय जागा संवर्गाला दिला जात नाही. महिला उमेदवारांसाठी ३० टक्के जागा राखीव असतात.

(१२ जुलै २०२५ रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी घोषित केली जाईल.)

**संपर्क हेल्पलाइन-** १८००२०९८८५१
**संकेतस्थळ-** mahacet.org

**करिअर समुपदेशक**

---



/ स्वाती साळुंखे
विदेशातील शिक्षण संधी



# अभ्यासाच्या पलीकडे काहीतरी वेगळं!

आजचं महाविद्यालयीन जीवन वेगळं आहे. अनेक विद्यार्थी मोबाइल, सोशल मिडिया आणि नेटफ्लिक्स यामध्ये गुंतलेले दिसतात. अभ्यासाची गती कमी होतेय आणि करिअरबाबत उत्साह नसलेले, दिशाहीन वाटणारे अनेक विद्यार्थी आजूबाजूला दिसतात. पण याच काळात जर काहीतरी वेगळं, अर्थपूर्ण केलं, तर करिअरच्या दृष्टीने तो एक मोठा 'टर्निंग पॉइंट' ठरू शकतो. त्याचं नाव आहे अभ्यासक्रमेतर उपक्रम - "एक्स्ट्रा करिक्युरल ॲक्टीव्हीटीस"

### ■ अभ्यासक्रमेतर उपक्रम म्हणजे काय?

हे म्हणजे अभ्यासक्रमाच्या बाहेरचे, पण शिकायला खूप काही देणारे उपक्रम.

उदाहरणार्थ -

- भाषण व निबंध स्पर्धा
- डिबेट, इव्हेंट मॅनेजमेंट
- सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेणे
- एनएसएस, एनसीसी, स्वयंसेवी संस्था
- कॉलेज मॅगझिनसाठी लेखन
- स्पर्धा परीक्षा क्लब्स, स्टार्टअप क्लब्स
- इंटर्नशिप्स आणि पार्ट-टाइम काम
- डिजिटल पोर्टफोलिओ तयार करणं, कोर्सेस करणं

हे उपक्रम करिअरचं भविष्य ठरवू शकतात, फक्त त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा.

### ■ हे उपक्रम का महत्त्वाचे?

**१. कम्युनिकेशन स्किल्स सुधारतात :**
स्पर्धा, ग्रुप प्रेझेंटेशन, स्टेजवर बोलणं - यामुळे आत्मविश्वास वाढतो. नोकरीच्या मुलाखतीत किंवा आपल्या बिझनेससाठी ही कौशल्यं खूप महत्त्वाची असतात.

**२. नेतृत्वगुण आणि टीमवर्क शिकायला मिळतं :**
एका इव्हेंटचं आयोजन करणं, टीमसोबत काम करणं, ही कौशल्यं उद्योगजगतात फार उपयुक्त ठरतात.

**३. नेटवर्किंगचा फायदा :**
या उपक्रमांमधून वेगवेगळ्या कॉलेजातील, क्षेत्रातील लोकांशी ओळख होते. ही ओळख भविष्यात नोकरी, व्यवसाय किंवा मार्गदर्शनासाठी उपयोगी पडू शकते.

**४. स्वतःची ओळख मिळते :**
आपल्याला काय जमतं, काय आवडतं, याची स्पष्टता मिळते. बऱ्याच वेळा विद्यार्थ्यांना करिअरमध्ये गोंधळ असतो कारण त्यांनी स्वतःला ओळखायला वेळच दिलेला नसतो.

**५. रेझ्युमेला वजन येतं :**
कॉलेजमध्ये केलेले उपक्रम, इंटर्नशिप्स, नेतृत्वाच्या भूमिका या सर्व गोष्टी नोकरी देणाऱ्या कंपन्यांना महत्त्वाच्या वाटतात.

### ■ विद्यार्थी अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये का सहभागी होत नाहीत?

आज महाविद्यालयीन पातळीवर अनेक उपक्रमांची संधी उपलब्ध असली, तरीही बऱ्याच विद्यार्थ्यांचा सहभाग फारसा दिसत नाही. यामागे अनेक कारणं असू शकतात. पहिलं आणि मुख्य कारण म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव. 'आपण कशातच चांगले नाही' 'समोर बोलायला लाज वाटते', 'लोक काय म्हणतील?' असे विचार विद्यार्थ्यांना मागे खेचतात. दुसरं कारण म्हणजे 'फक्त मार्क्स महत्त्वाचे' असा समाजाचा आणि पालकांचा आग्रह. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासापुरतेच मर्यादित राहतात.

> **फक्त अभ्यास करून यशस्वी करिअर घडत नाही; त्यासाठी तुमच्या अभ्यासाच्या पलीकडे काहीतरी वेगळं करणं गरजेचं असतं.**

तिसरा मोठा अडथळा म्हणजे आळशीपणा आणि वेळेचं व्यवस्थापन न करणे. मोबाइल आणि सोशल मीडियामुळे सततच्या डिस्ट्रॅक्शनमध्ये बराच वेळ वाया जातो आणि काहीतरी वेगळं करावं असं वाटतंही, तरी कृती होत नाही. काही वेळा कॉलेजमध्ये योग्य मार्गदर्शनाचा अभाव असतो - कुठे आणि कसं सहभागी व्हावं, याबद्दल स्पष्टता नसते. तसेच, काही विद्यार्थ्यांना वाटतं की हे उपक्रम फक्त 'हुशार', 'स्मार्ट' मुलांसाठीच असतात आणि आपण तिथे फिट बसणार नाही. काही वेळा त्यांना हेही वाटतं की, "हे उपक्रम करून काही फारसा फायदा होणार नाही" किंवा "यातून करिअरमध्ये काही फरक पडणार नाही", त्यामुळे त्यांना त्या गोष्टीत रस वाटत नाही. ही मानसिकता त्यांना संधीपासून दूर ठेवते. शिवाय, भय किंवा अपयशाचा अनुभव यामुळेही विद्यार्थी पुन्हा सहभागी होण्याची हिंमत करत नाहीत. अशा अनेक कारणांनी अनेक विद्यार्थ्यांच्या संधी हातून निघून जातात आणि नंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. कधी कधी, भय किंवा अपयशाचा अनुभव यामुळेही विद्यार्थी पुन्हा सहभागी होण्याची हिंमत करत नाहीत. अशा अनेक कारणांनी अनेक विद्यार्थ्यांच्या संधी हातून निघून जातात आणि नंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येते.




### ■ 'मोबाइल-फ्रेंडली' जीवनातून बाहेर पडा

आज बहुतेक विद्यार्थी मोबाइलमध्ये वेळ घालवतात - रील, गेम्स, मेम्स, व्हिडीओ. पण जर त्याच वेळेत एक TED Talk ऐकली, एक short course केला, एखादा ब्लॉग लिहिला किंवा कॉलेजच्या एखाद्या टीममध्ये सहभागी झालं, तर आयुष्यच बदलू शकतं.

### ■ मोबाइलचा वापर करायचा - पण स्मार्ट पद्धतीने.

उदाहरणार्थ :

Design, coding, marketing - YouTube वरून शिका
LinkedIn वर प्रोफाइल बनवा
Canva वर पोर्टफोलिओ तयार करा
Coursera/Google courses करा
स्वतःचा YouTube चॅनेल किंवा ब्लॉग चालवा

### ■ कुठून सुरुवात करायची?

**१. स्वतःला विचार करा - काय आवडतं?**
संगीत, लेखन, विज्ञान, समाजकार्य, फोटोग्राफी - काहीही असू शकतं.

**२. कॉलेजमध्ये काय उपलब्ध आहे ते शोधा :**
सर्व कॉलेजमध्ये काही ना काही क्लब्स, समित्या असतात. तिथे सहभागी व्हा.

**३. छोट्या पावलांनी सुरुवात करा :**
एका इव्हेंटमध्ये काम करा, एखाद्या स्पर्धेत भाग घ्या. सुरुवातीला मोठ्या यशाची अपेक्षा नका ठेवू; शिकण्याकडे लक्ष द्या.

**४. इंटरनेटचा उपयोग सर्जनशीलतेसाठी करा :**
शिकण्याचे अमाप साधनं इंटरनेटवर आहेत. अभ्यासाच्या पलीकडे स्वतःला तयार करण्यासाठी याचा वापर करा.

### ■ काही यशस्वी उदाहरणं

- एक विद्यार्थिनी जी कॉलेज मॅगझिनसाठी लिहायची, ती आता कंटेंट रायटर म्हणून MNC मध्ये काम करते.
- एक मुलगा NSS मधून ग्रामीण भागात काम करत होता - त्याला Social Sector मध्ये फेलोशिप मिळाली.
- एका विद्यार्थ्यानं कॉलेजमध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचं काम केलं आणि आज त्याची स्वतःची इव्हेंट कंपनी आहे.
- अनेकांनी coding club मध्ये भाग घेऊन हॅकाथॉन जिंकले आणि कंपन्यांकडून इंटर्नशिप ऑफर्स मिळवल्या.

### ■ शेवटी काय लक्षात ठेवायचं?

"करिअर घडवणं ही केवळ मार्कांच्या गोष्टी नसते. ती ही एक 'लाइफ प्रोजेक्ट' आहे." कॉलेज हे केवळ पदवी मिळवण्याचं ठिकाण नसून स्वतःला घडवण्याचा वेळ असतो. अभ्यासक्रमेतर उपक्रम हे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला, आत्मविश्वासाला आणि करिअरला नवा आयाम देतात.

### ■ आजपासूनच सुरुवात करा.

मोबाइल बाजूला ठेवा. एखाद्या उपक्रमात सामील व्हा. शिकायला सुरुवात करा - तुमच्या आतल्या शक्यतांना दिशा द्या. कारण उद्याचं यश आजच्या कृतीवर ठरतं.

**ग्रोथ सेंटरच्या व्यवस्थापकीय संचालक**

---



/ श्याम तारे
एआयच्या वाटा

# विद्यार्थी एआयच्या विळख्यात

विद्यार्थ्यांची एक संपूर्ण पिढी एआयच्या विळख्यात अडकलेली दिसते आहे. आता संवादातही विद्यार्थी एआयचा वापर करू लागले आहेत, हे लक्षण चांगले नाही. असा सूर आजवर अनेकांनी काढला असला तरी एआयचा पुरस्कार करणाऱ्यांनी त्याकडे फारसे लक्ष न देता आपले नवनवीन उद्योग, अर्थात चॅटबॉट (मराठी गप्पिष्ट), तयार करून तरुणाई व कोवळ्या मुलांना आपल्या जाळ्यात फसवणे सुरूच ठेवले आहे. त्यातून काही तरुण ग्राहक बळीही गेले आहेत.

एक मोबाइल आणि त्यामधील अत्याधुनिक, हवामानासारखा चेहरा तसेच हावभावांसह संवाद साधू शकणारे हे चॅटबॉट (मराठी गप्पिष्ट) नादाला लावण्याच्या बाबतीत तरबेज आहेत. ते कोणत्याही विषयावर बोलू शकतात, आणि मुख्य म्हणजे तुमच्याच वाक्यातील शब्दांसाठी LLM या बहुभाषिक माहितीच्या खजिन्यात क्षणात शोध घेऊन ग्राहकाला नेमके हवे असलेले उत्तर देतात. त्याला भावना नाहीत, असे म्हटले जात असले तरी तो आपल्या शब्दवेल्हाळपणाने एकेक डाव जिंकत जातो आणि ग्राहक त्याचा गुलाम होतो. हे व्यसन ग्राहकाला घरातील हत्यारांपर्यंत नेते आणि त्याचा वापर करण्याची वेळ आणते.

ही सगळी कहाणी भयानक भविष्यसूचक आहे. यावर सखोल चर्चा करताना कॅनडामधील टोरोंटो येथील यॉर्क विद्यापीठात 'सामाजिक न्यायासाठी डिजिटल सुशासन' या विषयाचे अध्यापन करणारे रॉबर्ट गेल म्हणाले की, या स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी एआय केवळ घातक नाही, तर कल्पनातीत स्वरूपाचे विध्वंसक ठरणार आहे. त्रस्त प्राध्यापकांच्या चर्चेतील विधाने तर स्फोटकच म्हणावी लागतील. त्यांच्या मते, एआय आणि त्याची साधने ही गृहपाठ करताना फसवणूक करण्याची यंत्रे वाटतात. जी उत्तरे दिली जातात, त्यापैकी एकही शब्द विद्यार्थ्याने लिहिलेला नसतो. त्यामुळे एआयचे विविध नमुने विद्यार्थ्यांची आजची व येणारी पिढी नष्ट करू शकतील, अशी दाट शक्यता आहे.

प्राध्यापक गेल पुढे म्हणाले की, काही संस्था देखील काही कंपन्यांच्या सोबत आहेत आणि त्या शिक्षकांना कमी लेखणारी साधने घेण्याची व वापरण्याची जणू जबरदस्तीच करीत आहेत. अशा साधनांचा वापर कमी व्हावा यासाठी प्राध्यापक प्रयत्नशील असतात; परंतु "अशी एआय साधने वापरू नका," असे सांगितल्यावर विद्यार्थी एका कानाने ऐकतात आणि दुसऱ्या कानाने सोडून देतात. आपली निरीक्षणे एकत्र करण्यासाठी किंवा त्याचा निष्कर्ष मसुदा तयार करण्यासाठी ते स्वतःच्या बुद्धीऐवजी एआय साधने वापरून काम उरकतात.

प्रत्येक प्राध्यापकाने मांडलेले अनुभव थरारक होते. एक प्राध्यापक म्हणाले की, त्यांच्या वर्गात सादर झालेल्या किमान ४० टक्के कामांमध्ये एआयचा स्पष्ट वापर दिसतो. दुसरे प्राध्यापक म्हणाले की, 'जबाबदार एआय' या विषयावरील डॉक्टरेट स्तराच्या लेखनातही जागोजागी एआयचा वापर आढळला. आणखी एका प्राध्यापकांनी तर गमतीदार किस्सा सांगितला-विद्यार्थी जे लिहितात, ती भाषा अनेकदा त्यांनाच वाचता येत नाही. त्यामुळे काही वाक्ये किंवा शब्द गाळायचे असतात, याचे त्यांना भानच राहत नाही. "This summary meets the requirements of the prompt, I hope it is helpful to you!" असे वाक्यच प्राध्यापकांनी सांगितले.

आभासी किंवा 'झूम' पद्धतीने शिकवणारे एक प्राध्यापक म्हणाले, "त्यांच्या मोबाइलवर एखादा 'गप्पिष्ट' असावा, अशी मला शंका आहे. कारण बोलवणारा वेगळा होता, हे स्पष्ट दिसत होते." अशा वर्गात प्रश्नोत्तर होत असताना विद्यार्थी 'म्यूट' होतो आणि काही वेळाने पढवलेले उत्तर देतो, असेही घडले आहे. हे विश्वासार्ह मानता येईल का?

एक तर विद्यार्थी ना स्वतः बोलतात ना स्वतः उत्तर देतात. अशा स्थितीत तुम्ही त्यांना शिकवणार काय आणि ते शिकणार काय? त्यामुळे ही आणि पुढची पिढी वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

चर्चेच्या समारोपप्रसंगी बोलताना एका प्राध्यापकाला राहवले नसावे... ते एकाएकी बोलून गेले, "प्रामाणिकपणे सांगायचे, तर ही सगळी एआय साधने चक्क सूर्याच्या चुलीत घालावी... परतीची वाट नकोच!"

## शॉर्ट न्यूज



### मध्यरात्री..रावेर शहरात वाळू टोळक्यांचा मुक्तसंचार

**रावेर ।** रावेर शहरात रात्रीच्या वेळी मोटारसायकलवर फिरणाऱ्या अनोळखी टोळक्यांमुळे तसेच भरधाव वेगाने जाणाऱ्या वाळूच्या ट्रॅक्टर्समुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या प्रकारावर नियंत्रण आणण्यासाठी पोलिस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांनी लक्ष घालावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नुकत्याच घडलेल्या चोऱ्यांच्या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी रात्री १२ ते पहाटे ५ दरम्यान २०-३० अनोळखी व्यक्ती मोटारसायकलवरून विविध कॉलनींमध्ये फिरत असल्याचे पाहिले. विशेष म्हणजे या टोळक्यांचा वावर स्टेशन रोड, स्वस्तिक टॉकीज समोरील पेट्रोल पंप, भाऊ हॉटेल परिसर अशा अनेक ठिकाणी रात्री स्पष्ट दिसून आला आहे. या व्यक्तींकडे ५ ते ६ मोटारसायकल्स असून त्यांची हालचाल संशयास्पद आहे. स्थानिक पत्रकारांनी केलेल्या रिलिटी चेकमध्येही हे दृश्यमान झाले. नागरिकांचा प्रश्न असा आहे की, कायदा सर्वांसाठी समान असताना, हे अनोळखी लोक मात्र मध्यरात्री मुक्तपणे फिरू शकतात आणि वाळूचे ट्रॅक्टर्स भरधाव वेगाने शहरात जातात - हे चालूच कसे दिले जाते? चोरीच्या घटना, मध्यरात्री वाळू टोळक्यांचा होणारा उपद्रव आणि वाढते असुरक्षिततेचे वातावरण पाहता, पोलिस प्रशासनाने या गंभीर प्रश्नांकडे तात्काळ लक्ष देऊन कडक बंदोबस्त करावा, अशी ठाम मागणी शहरवासीयांनी केली आहे.

# पाचोरा पिपल्स बँक निवडणुकीत एक उमेदवार नडला ; बिनविरोधचा प्रयत्न फसला

## एकमेव उमेदवाराच्या आडमुठे धोरणातून बँकेचे आर्थिक नुकसान !

। पाचोरा प्रतिनिधी ।

बँकिंग क्षेत्रात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पाचोरा पिपल्स बँकेची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. बँकेचे १५ संचालक मंडळ असते. या बँकेचा पाच जिल्ह्यात विस्तार वाढला असून पाचोरा, भडगांव आणि जामनेर तालुक्यात बँकेचे मतदार सभासद असल्याने या बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विद्यमान चेअरमन यांनी मंत्री गिरीश महाजन, आमदार किशोर पाटील, माजी आ.दिलीप वाघ यांचे कडे सहकार्य अपेक्षित ठेवले होते. सहकारात राजकारण नको म्हणुन या तिघांनी बँकेच्या निवडणुकीत पॅनल न टाकता विद्यमान संचालक मंडळाला हिरवा कंदील दिला होता. त्यामुळे बँकेची निवडणूक बिनविरोध होणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या घडामोडीत जनरल मधून जागांसाठी विद्यमान चेअरमन ॲड. अतुल सुभाषचंद्र संघवी सह प्रशांत श्रीकिसन अग्रवाल, स्वप्निल सुधारकर पाटील, देवेंद्र रमनलाल कोटेचा, अनंतराव बाबुराव पाटील, राहुल अशोक संघवी, नरेंद्र उत्तमराव पाटील, पुखराज इंदरचंद डांगी, अविनाश वसंतराव कुडे. अन्य उमेदवारांनी माघार झाल्याने जनरल च्या ९ उमेदवार बिनविरोध असून ॲड.अतुल संघवी यांचे सहकार पॅनेलचे बँकेवर वर्चस्व स्पष्ट आहे. मात्र सहकार पॅनलविरुद्ध माघारीच्या अखेर पर्यंत निलेश विनायक मराठे यांनी जनरल मधून एकमेव अर्ज माघारी न घेतल्याने बँकेचा बिनविरोधाचा आटापिटा अडचणीत आला. म्हणून आता एक विरुद्ध उर्वरित जागांसाठी निवडणूक आहे. ओबीसी, महिला, एनटी व अनुसूचित जाती-जमाती या राखीव जागा बिनविरोध झाल्या आहे. ओबीसी जागेवर भागवत एकनाथ महालपुरे, पवन राजमल अग्रवाल, महिला जागांवर संगिता शरद पाटे व संध्या प्रकाश पाटील, एनटी प्रवर्गातून विकास ज्ञानेश्वर वाघ, अनु. जाती-जमाती प्रवर्गातून अविनाश मुकुंदराव भालेराव यांची बिनविरोध निवड झाले आहे.



### एकमेव उमेदवाराच्या आडमुठे धोरणातून बँकेचे आर्थिक नुकसान

» **एकमेव** निलेश मराठे यांच्या एकमेव उमेदवारी मुळे वेळ , पैसा आणि मेहनत टाकून बँकेचे हित जोपासण्यासाठी निवडणुकीसाठी बँकेचे लाखों रुपयांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी माघारीच्या अखेर पर्यंत उमेदवारी करणाऱ्या निलेश मराठे यांना सर्व स्तरावर प्रयत्न करण्यात आले, आमदार किशोर आप्पा पाटील यांनी देखील उमेदवाराची नाराजीची बाजू ऐकून घेत त्यांना बँकेच्या हितासाठी माघार घेण्या साठी प्रयत्न केला मात्र उमेदवाराने कोणाचेच ऐकून न घेता उमेदवारी कायम ठेवल्याने बँकेच्या बिनविरोधचा प्रयत्न फसला असून येत्या १३जुलै रोजी मतदान होणार आहे.
दि.३० जून ची माघार प्रक्रिया पार पडल्या नंतर अतुल संघवी यांनी ज्यकिरण प्रभाजी बँकेत आ. किशोरआप्पा पाटील यांच्या उपस्थितीत तातडीची पत्रकार परिषद घेऊन बँकेची निवडणूक टाळण्यासाठी माघार घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले. विरोधी उमेदवार निलेश मराठे हे त्यांच्या वैयक्तिक आर्थिक हितासाठी बँकेला वेठीस धरून आडमुठे धोरणातून उमेदवारी करीत असल्याने बँकेचे सुमारे वीस , पंचवीस लाखांचे आर्थिक नुकसान आणि वेळ वाया जाणार आहे. आ. किशोर आप्पा पाटील म्हणाले की सहकारात राजकारण नको म्हणून मी ,माजी आमदार आणि मंत्री श्री. महाजन यांनी मोठेपणा दाखवून बँकेच्या हित पाहून सहकार्याची भूमिका घेतली आहे. मात्र एकमेव उमेदवार निलेश मराठे यांची सर्वांनी आणि मी देखील बँकेच्या हितासाठी समजूत काढून देखील ते उमेदवारी वर कायम आहे.

# जळगाव बस स्थानकातून मोबाईल चोरणाऱ्या तरुणाला अटक, दुसरा फरार

। जळगाव प्रतिनिधी।

**शहरातील** बसस्थानक परिसरातून मोबाईल चोरी करणाऱ्या एका मालेगाव येथील चोरट्यांला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीचे चार मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. मात्र, त्याचा मालेगाव येथील साथीदार सोनू हा पळून जाण्यात यशस्वी झाला. जिल्हापेठ पोलिसांनी रेल्वे पोलीस दलाच्या सहकार्याने ही कामगिरी केली.
शेख इम्रान शेख गुफरान (वय २२, रा. गुलशन नगर, मालेगाव) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. जिल्हापेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांनी नवीन बसस्थानक परिसरातून चोरी झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना पोहेकॉ नरेश सोनवणे, पोहेकॉ मिलिंद सोनवणे, पोकॉ राहुल पाटील आणि नरेंद्र दिवेकर यांना दिल्या होत्या. त्यानुसार, हे पथक बसस्थानक परिसरात गस्त घालत असताना, दोन संशयितांनी पोलिसांना पाहून पळ काढला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग



करत, रेल्वे सुरक्षा दलाच्या मदतीने शेख इम्रान शेख गुफरान याला रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर पकडले. त्याच्याकडे सापडलेल्या ४ मोबाईलबाबत चौकशी केली असता, त्याने पळून गेलेला त्याचा साथीदार सोनू याच्यासोबत बसस्थानकातून मोबाईल चोरल्याची कबुली दिली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील पत्नी ठार, पती गंभीर जखमी

**जळगाव ।** तालुक्यातील जळगाव ते ममुराबाद रस्त्यावरील प्रजापत नगरजवळ शुक्रवारी दि. २७ जून रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास झालेल्या पिकअप वाहनाने दुचाकीला दिलेल्या जबर धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे पती गंभीर जखमी झाले. भरधाव वेगाने येणाऱ्या एका पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या प्रकरणी सोमवारी दि. ३० जून दुपारी १ वाजता जळगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संजिदा जुम्मा तडवी (वय ४२, रा. सावखेडा सीम, ता. यावल) असे मृत महिलेचे नाव आहे. सावखेडा सीम येथील जुम्मा फकीरा तडवी (वय ४२) हे पत्नी संजिदा तडवी व परिवारासह राहतात. संजिदा तडवी या बचत गटाच्या सदस्य असल्याने त्या जळगाव येथे आयोजित एका शिबिरात सहभागी झाल्या होत्या. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी २७ जून रोजी शिबीर आटोपल्यानंतर संजिदा तडवी पती जुम्मा तडवी यांच्यासोबत आपल्या दुचाकीने (एमएच १९ ईएल २५८२) सावखेडा सीम येथील घरी जाण्यासाठी निघाल्या होत्या.
सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास हे दाम्पत्य जळगाव ते ममुराबाद रस्त्याने जात असताना, प्रजापत नगरजवळ एका अज्ञात पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, संजिदा तडवी यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे पती जुम्मा तडवी गंभीर जखमी झाले. अपघात घडल्यानंतर पिकअप चालक आपले वाहन घेऊन घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी अखेर सोमवारी दि. ३० जून रोजी दुपारी १ वाजता जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रदीप राजपूत करत आहेत.

# जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये जागतिक डॉक्टर्स डे उत्साहात साजरा

। जळगाव प्रतिनिधी।

**१ जुलै** हा दिवस भारतात 'डॉक्टर्स डे' म्हणून साजरा केला जातो. या अनुशंगाने जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये जागतिक डॉक्टर्स दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी 'डॉक्टर्स डे' चे औचित्य साधून शालेय विध्यार्थ्यासाठी नेत्र तपासणी शिबीर, डॉक्टरांचे महत्व या विषयावर कार्यशाळा असे विविध उपक्रम राबविण्यात आले.
सदर कार्यक्रमात सर्वप्रथम जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती क्रिस्टाबेल परेरा यांच्या हस्ते उपस्थित डॉक्टर मान्यवरांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून आजच्या दिवशी या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.




» **विद्यार्थ्यांचे** डोळे तपासणी करण्यासाठी डॉ. दर्शना शाह, डॉ.प्रवीण पाटील, डॉ. निकुंज गुजराथी व त्यांचे सहकारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. या सर्वांनी विद्यार्थ्यांचे डोळे तपासले व त्यांची काळजी व निगा कशी घ्यायची याचे काही तंत्रशुद्ध पद्धत सांगून या पथकाने प्रात्यक्षिक देखील करून दाखवले. काही विद्यार्थ्यांना डोळ्यांची समस्या होती त्यांना पुढील उपचाराकारिता डॉक्टरांच्या रूग्णालयात पालकांना सोबत घेऊन येण्यास सांगितले. तसेच मुख्याध्यापिका क्रिस्टाबेल परेरा यांनी १ जुलै हा दिवस डॉक्टरांच्या समर्पणावर भर देतो, आयुष्यभर लाखो लोकांचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांचा मोलाचा वाटा असतो आणि हा दिवस त्यांच्या कार्याचे कौतुक आणि मानवी जीवनातील डॉक्टरांच्या भूमिकेचा सन्मान करतो,असे नमूद केले. यावेळी काही विध्यार्थ्यानी डॉक्टरांची वेशभूषा साकारली होती. विध्यार्थ्यानी वैद्यकीय व्यवसाय समजून घेण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक शाळेतील शिक्षिका श्रीमती लीना त्रिपाठी यांनी केले तर सदर कार्यक्रमाचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्धल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या संचालिका श्रीमती पलकजी रायसोनी यांनी अभिनंदन केले.

# शेतमजुराची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या

। पाचोरा प्रतिनिधी।

**तालुक्यातील** भोजे येथे शेतमजुरी करणाऱ्या व्यक्तीने घरातच पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना दि. ३० जून रोजी सकाळी साडेआठ वाजता उघडकीस आली आहे. पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.
जीवन भरतगिर गोसावी (वय ४५, रा. भोजे ता. पाचोरा) असे मयत इसमाचे नाव आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, ४ विवाहित मुली असा परिवार आहे. शेतमजुरी करून परिवाराचा उदरनिर्वाह ते करीत होते.(केसीएन) रविवारी दि. २९ रोजी रात्री कुटुंब झोपले. पहाटे पत्नी नेहमीच्या कामाप्रमाणे शेतीच्या कामानिमित्त घरातून बाहेर गेल्या. घरात पती आणि मुलगा दोघेच होते. सकाळी ८ वाजेनंतर जीवन गोसावी याने पंख्याला गळफास लावून घेत आत्महत्या केली. काही वेळाने मुलाने घरात पाहिले तर वडिलांनी गळफास लावून घेत आत्महत्या केली होती. त्याने आजूबाजूच्या ग्रामस्थांच्या मदतीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयत घोषित केले.यावेळी कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. घटनेची पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशन येथे नोंद करण्यात आली आहे. घटनेमुळे भोजे गावात शोककळा पसरली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून 'समृद्ध ग्रामपंचायत अभियान' प्रभावीपणे सुरू

। जळगाव प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील** ग्रामपंचायती सक्षम, स्वयंपूर्ण व समृद्ध व्हाव्यात, तसेच गावांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित व्हावा, या उद्दिष्टाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून 'समृद्ध ग्रामपंचायत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील निवडलेल्या ३०० ग्रामपंचायतींमध्ये सोमवार दि. ३० जून रोजी भव्य स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.



» **या उपक्रमाची** औपचारिक सुरुवात धरणगाव तालुक्यातील मुसळी गावातून मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, गट विकास अधिकारी किशोर वानखेडे, ग्रामस्थ व विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक सोमवारी गावात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. याचाच एक भाग म्हणून ३० जून रोजी एकाच दिवशी जिल्ह्यातील ३०० गावांमध्ये एकत्रित स्वच्छता मोहीम पार पडली. स्वच्छतेबरोबरच 'एक पेड माँ के नाम' या विशेष उपक्रमांतर्गत वृक्षारोपणही करण्यात आले. या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाबरोबर मातृस्मरणही साधले गेले.

# वुमेन्स ॲण्ड चाईल्ड केअर प्लस आयोजित रक्तदान शिबिरात सहा रणरागिणींचे रक्तदान!

। जळगाव प्रतिनिधी।

**एस.एम.आय.टी.** कॉलेज परिसरात नुकत्याच पार पडलेल्या रक्तदान शिबिरात सहा महिलांनी रक्तदान करून महिलाही राष्ट्रसेवेत मागे नाहीत, हे सप्रमाण सिद्ध केले. वुमेन्स ॲण्ड चाईल्ड केअर प्लस आणि आधार ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात एकूण १६ जणांनी रक्तदान केले. विशेष बाब म्हणजे ६० वर्षांच्या सौ. सरला राजेंद्र सूर्यवंशी यांनी स्वतः रक्तदान करून विद्यार्थ्यांनाही रक्तदानासाठी प्रेरित केले. त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला रेडक्रॉस रक्त केंद्राचे चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, संचालक पुष्पात भंडारी, मंगला ठोंबरे, उषा शर्मा, तसेच संस्थेच्या अध्यक्ष व रेडक्रॉसच्या संचालक शांता वाणी आणि संभाजीराव देसाई (अध्यक्ष, आधार ज्येष्ठ




नागरिक संघ) मंचावर उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर, शांता वाणी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा सादर केला. डॉ. रेदासनी यांनी रक्तदानाचे महत्व विशद करताना सावली या नवीन उपक्रमाची माहिती दिली आणि ते जळगावात सुरु करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता कुलकर्णी यांनी केले, तर शालिनी चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले.

# रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव रॉयल्सचा पदग्रहण सोहळा संपन्न

। चाळीसगाव प्रतिनिधी।

२८ जून २०२५ शनिवार रोजी सायंकाळी ६:३० वाजता शहरातील अरिहंत मंगल कार्यालय येथे रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव रॉयल्सचा नूतन कार्यकारिणीची पदग्रहण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे माजी प्रांतपाल रोटे मिलिंद कुलकर्णी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मंगेशदादा चव्हाण, रोटे. डॉ. राजेश पाटील (पुढील डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डिस्ट्रिक्ट ३०३०) आणि रोटरी लर्निंग इन्स्टिटयूट चे रोटे. सीएम बेंद्रे ( ठाणे ), असिस्टन्ट गव्हर्नर रोटे किरण देशमुख , बापजी हॉस्पिटल चे संचालक रोटे डॉ संदीप देशमुख तसेच प्रदीप दादा देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे मावळते अध्यक्ष रोटे. डॉ.स्वप्निल शिंदे यांनी आपला कार्यकाळ संपवून पदभार नूतन अध्यक्ष रोटे. डॉ. विरजा देशमुख यांच्याकडे सुपूर्त केला तसेच त्यांनी त्यांच्या मनोगतात मागील वर्षी केलेल्या प्रकल्पांचे माहिती दिली तसेच नूतन अध्यक्ष रोटे.डॉ. विरजा देशमुख यांनी पदभार स्वीकारते वेळी आपले मनोगत व्यक्त केले त्यात त्यांनी येत्या ५ जुलै २०२५ रोजी फेको मशीन द्वारे भव्य मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले असून बापजी हॉस्पिटल चाळीसगाव येथे रोटरीच्या माध्यमातून भव्य रोटरी रॉयल्स आय केअर सेंटर उभे राहत असल्याचे सांगितले. तसेच वालझिरी येथे सौर ऊर्जा प्रकल्प या वर्षात करण्याचे मनोगत बोलून दाखविले तसेच मावळते सचिव रोटे.संदीप चव्हाण यांनी सचिव पदाची सूत्रे रोटे. ऋषभ सुराणा व रोटे. भरत दायमा यांच्याकडे सुपूर्द केली. आमदार मंगेश दादा चव्हाण यांनी आपल्या भाषणात रोटरी क्लबला नेतृत्वाची शाळा असे गौरोदगार देऊन क्लबच्या कार्याचे कौतुक केले त्यांनी स्वतः रोटरी सदस्यत्व स्वीकारले आणि सांगितले की लोकप्रतिनिधी तर आहेच पण खऱ्या समाजसेवकाच्या भूमिकेतून परिवर्तनासाठी पुढाकार घेणे ही खरी जबाबदारी आहे असेही ते म्हणाले.




» **कार्यक्रमाचे** अध्यक्ष रोटे.मिलिंद कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात सांगितले की रॉयल्स म्हणजेच रॉयल थाट असं म्हणत रोटरीच्या १२० वर्षाच्या सेवेचा गौरव केला. सूत्रसंचालन प्राध्यापक विजय गर्गे यांनी केले. आभार प्रदर्शन अंकिता वृषभ सुराणा यांनी मानले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे मच्छिन्द्र भाऊ राठोड, जेष्ठ पत्रकार किसनरावजी जोर्वेकर, एम बी पाटील, नगरसेवक रामचंद्र जाधव, दिपक पाटील, शशिकांत धामणे, मधुकर कासार, राजेंद्र कटारिया, प्रदीप देशमुख, योगेश भोकरे, श्रीकृष्ण अहिरे, रवींद्र शिरुडे, डॉ प्रशांत शिनकर, डॉ नितीन देवरे असे व इतर मान्यवर उपस्थित होते. तसेच रोटरी क्लब ऑफ चाळीसगाव, मिल्कसिटी संगम, मनमाड मॅजिक, तसेच जळगाव वेस्ट क्लब चे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी रोटरी चाळीसगाव रॉयल्स चे हर्षद ढाके, हरेश जैन, अल्पेश बागड, राज पुन्शी, दिलीप पवार, डॉ प्रियंका खेडकर , अंजली शिंदे, कविता चव्हाण, नीरज कोतकर, सुधन्वा कुलकर्णी, तमाल देशमुख, महेंद्र वर्मा, पराग बढे, आनंद पाटील, विनायक ठाकरे, बाळासाहेब गोपाळ, पूजा भामरे यांनी कार्यक्रम संपन्नतेसाठी विशेष मेहनत घेतली.

# शानभाग विद्यालयात डे - स्कॉलर पालक सभा उत्साहात संपन्न

## सुमधुर आवाजात सुश्राव्य असे स्वागतगीत सादर करून पालकांची मने जिंकली

। जळगाव प्रतिनिधी।

विवेकानंद प्रतिष्ठान संचालित कै. श्रीमती ब. गो. शानभाग विद्यालयात दिनांक ०१ जुलै २०२५, मंगळवार रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत इयत्ता ५वी ते ७ वी डे-स्कॉलर विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विशेष पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन शानभाग विद्यालयाच्या अटल टिंकरिंग लॅब येथे करण्यात आले.
सभेचे प्रमुख पाहुणे म्हणून सुरज सोमाणी (माजी विद्यार्थी व उत्कृष्ट फुटबॉल खेळाडू) हे उपस्थित होते. दीपप्रज्वलन कार्यक्रम विकास सोनवणे व वैशाली सोनवणे (विद्यार्थी पालक) तसेच व्यासपीठावर उपस्थित मान्यवर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. प्रारंभी डे स्कॉलर विद्यार्थिनींनी त्यांच्या सुमधुर आवाजात सुश्राव्य असे स्वागतगीत सादर करून पालकांची मने जिंकली.



» **शाळेतील** विविध उपक्रम व सुविधा याविषयी राजेंद्र पाटील यांनी पीपीटी सादरीकरण द्वारे माहिती दिली. प्रमुख पाहुणे मा. सुरज सोमाणी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या शाळेने दिलेल्या मूल्याधिष्ठित शिक्षणामुळे जीवनाला योग्य दिशा मिळाली. आज मी जे काही आहे, त्यामागे इथल्या संस्कारांचे मोठे योगदान आहे. मा.मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील यांनी पालकांच्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देत पालकत्वाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट करत शिक्षण प्रक्रियेत पालकांचा सहभाग कसा महत्त्वाचा आहे, हे सांगितले. सभेचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नंदिनी टाकणे यांनी केले. पालक सभा नियोजन श्री. हर्षल घोलाणे व सचिन पाटील यांनी केले. या पालक सभेच्या माध्यमातून पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ झाला असून, शाळेतील शैक्षणिक व मूल्याधिष्ठित कार्यप्रणालीचे पालकांनी भरभरून कौतुक केले.

## संपादकीय

# मराठी बाण्याचा हिसका

महाराष्ट्राच्या मातीत परप्रांतीय भाषा रुजवण्याचा नाहक प्रयत्न म्हणून पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय अखेर राज्य सरकारला रद्द करावा लागला, हे मराठी माणसाच्या एकीचे बळ आहे. मराठी भाषा आणि मराठी संस्कृती याबाबत तडजोड करता उपयोगी नाही, हा संदेश राज्य सरकारने यापुढे कायम लक्षात ठेवायला हवा. मुळात शाळेत सक्तीचा विषय करण्यासाठी हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४३ मधील पहिल्या अनुच्छेदानुसार हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा नाही. भारताला अधिकृतपणे कोणतीही राष्ट्रभाषा नाही, अथवा कोणत्याही भाषेला हा दर्जा नाही. हिंदी ही भारताची एक अधिकृत भाषा आहे आणि राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात अशा २२ भाषांची यादी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या कामकाजात हिंदी भाषा वापरली जात असली, तरीही ती राष्ट्रभाषा नाही. भारत हा विविध भाषा आणि संस्कृती असलेला देश असल्याने कोणत्याही भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा देणे योग्य मानले जात नाही. असे असताना महाराष्ट्रात हिंदीसक्ती करण्याचा राज्य सरकारचा आटापिटा का? गेल्या अर्धशतकात परप्रांतांमधून मुंबईत आलेल्या आक्रमक लोंढ्यांनी हळूहळू राज्य गिळंकृत केले. संचारस्वातंत्र्य मान्य केले तरी ते अतिरेकी नसावे. त्या लोंढ्यांनी इथल्या जमिनी लाटल्या, बेसुमार अतिक्रमणे केली आणि व्यवहारात आपली भाषाही लादली. त्यांच्या संख्याबळाच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात मराठी माणसाचे अस्तित्व धूसर होत आहे. त्याच परप्रांतीयांची मने आणि मते जिंकण्यासाठी आता शालेय शिक्षणातही हिंदीसक्तीचा घाट घालण्यात आला होता. कुठे मराठीची सक्ती करण्याचा विषय आला की हातपाय थरथरणारे सरकार, हिंदीबाबत मात्र दोन जीआर तत्परतेने काढून मोकळे झाले. हिंदीसक्ती हा निव्वळ राजकीय अजेंडा होता. हिंदीसक्ती न केल्याने आजवर काहीच अडले नव्हते. हिंदीसक्ती करून मराठी माणसाला पिछाडीवर नेण्याचाच हा डाव होता. मराठीचा मुद्दा येताच चलबिचल होणारे सरकार, हिंदीसक्तीबाबत उत्साही दिसत असल्याचा राग मराठी मनात गेल्या काही दिवसांपासून चांगलाच धुमसत होता. हा राग आपल्याला अडचणीत आणेल आणि विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांना उत्तर देत बसावे लागेल, याची कल्पना आल्यानेच सरकारने आता ही सक्ती रद्द करण्याचा निर्णय घेतला. मराठीवरील प्रेमापोटी ही सक्ती रद्द करण्यात आलेली नाही. कारण विरोध झाला नसता, तर राज्य सरकार बिनबोभाट सक्ती राबवून मोकळे झाले असते. या पार्श्वभूमीवर हे लक्षात घ्यावे लागेल की हिंदी भाषेचा द्वेष करण्याचा मुद्दा कुठेही नाही. उलट मराठी माणूस इतका सोशिक आहे आणि हिंदीचे आक्रमण त्याने इतके गृहीत धरले आहे की, सध्या महाराष्ट्र हे हिंदी भाषिक राज्य आहे का, असाच प्रश्न इथे येणाऱ्या कुणालाही पडू शकेल, अशी परिस्थिती आहे. मुंबईसह अनेक शहरांच्या महापालिका निवडणुका लवकरच येऊ घातल्या आहेत. मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर, वसई-विरार, नवी मुंबई, पनवेल इथपासून नाशिक, पुणे अशी सारीच शहरे परप्रांतीयांनी काठोकाठ भरली आहेत. या सगळ्या महापालिकांमध्ये यश मिळवायचे, तर त्यासाठी हिंदीसक्ती करून परप्रांतीयांची मते मिळवायची, हेच गणित यामागे होते. अर्थात, कुठल्या राजकीय पक्षाने कुठली भूमिका घ्यावी, हे त्या त्या पक्षाचे स्वातंत्र्य आहे. पण यात भाषेची गळचेपी होत असेल, तर राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवत मराठी माणसाने एकत्र यायला हवे आणि तसे यावेळी घडले. अन्य भाषेची सक्ती म्हणजे मराठीचे स्थान जाणीवपूर्वक डळमळीत करण्याचा प्रकार आहे. संपूर्ण देशात हिंदी लादून स्थानिक भाषांना दुय्यम स्थान देण्याचा प्रकार पूर्वीपासून सुरू आहे. काही वर्षांपूर्वी तमिळनाडूच्या एका खासदाराला, 'तुम्हाला हिंदी येत नाही का? तुम्ही भारतीय नाही का?' अशा संतापजनक टिप्पणीला सामोरे जावे लागले होते. कुठल्याही धर्मावरून राष्ट्रप्रेम ठरवले जाणे चुकीचे आहे, तितकेच कुठल्याही भाषेवरून टिप्पणी केली जाणेही गैर आहे. आता जनमताचा रेटा पाहून हिंदीसक्ती रद्द करतानाही राज्य सरकारने जी खेळी खेळली आहे तीही संतापजनक आहे. एकीकडे हिंदीसक्तीचे दोन्ही जीआर रद्द केल्याची घोषणा करायची आणि दुसरीकडे त्रिभाषा सूत्राबाबत आणखी एक समिती नेमायची, हा खोडसाळपणा झाला. म्हणजे अजूनही जनमताचा आदर करण्यास सरकार तयार नाही, हेच यातून दिसून येते. भविष्यात हिंदीसक्तीसाठी ही एक चोरवाट सरकारने तयार करून ठेवली आहे. हिंदीसक्ती रद्द करतानाही मनाचा कोतेपणा दाखवलाच. या निमित्ताने मराठी माणूस बऱ्याच दिवसांनी जागा झाला, हेही नसे थोडके. मराठीच्या संवर्धनासाठी कायमच जागं राहावं लागणार आहे.

> **परप्रांतीयांची मने आणि मते जिंकण्यासाठी आता शालेय शिक्षणातही हिंदीसक्तीचा घाट घालण्यात आला होता. कुठे मराठीची सक्ती करण्याचा विषय आला की, हातपाय थरथरणारे सरकार, हिंदीबाबत मात्र दोन जीआर तत्परतेने काढून मोकळे झाले. हिंदीसक्ती हा निव्वळ राजकीय अजेंडा होता. हिंदीसक्ती करून मराठी माणसाला पिछाडीवर नेण्याचाच हा डाव होता.**

## मनन चिंतन

ह.भ.प. देवदत्त परुळेकर



### क्रोध हाच नरक

स्वर्ग किंवा नरक शोधण्यासाठी आपल्याला आपला हा देह टाकून, हे जीवन संपवून, हा मृत्युलोक सोडून परलोकात जाण्याची काहीच आवश्यकता नाही. स्वर्ग किंवा नरकाचा अनुभव आपण याच मानवी देहात, याच मृत्युलोकी, पृथ्वीवर घेऊ शकतो. किंबहुना असा अनुभव आपल्याला नेहमीच येत असतो, याकडे एकनाथ महाराज आपले लक्ष वेधतात. अरे, जिथे काम, क्रोध, लोभ इत्यादी विकार मनामध्ये आहेत ते या विकारांनी भरलेले मन म्हणजेच नरक होय असे एकनाथ महाराज सांगतात. एवढेच नव्हे तर हे विकार म्हणजेच नरक होय, असेही पुढे ते स्पष्ट करतात.

साधा विचार करा. घरातील एखादी व्यक्ती जरी क्रोधासारख्या भयंकर विकाराने ग्रासलेली असेल तर त्या घरात सुख, समाधान, शांती नांदू शकेल काय? त्या घरातील प्रत्येक व्यक्ती नेहमी चिंतेने ग्रासलेली, दडपणाखाली झुकलेली आपण पाहतो. हा क्रोधरूपी नरकाचा अनुभव होय. या उलट ज्या मनात दया, क्षमा, शांती इत्यादी सद्गुणांची वस्ती असते ते मन म्हणजेच स्वर्ग होय. किंबहुना हे सद्गुण म्हणजेच स्वर्ग होय. हे सद्गुण ज्यांच्याकडे प्रामुख्याने आहेत अशा व्यक्ती ज्या घरात राहतात ते घर स्वर्गच बनून जाते.



**क्रोधाविषयी जमदग्नी ऋषि पुढे म्हणतात -**

**क्रोध कामाचा कैवारी। क्रोध अभिमानाचा सहाय्यकारी।**
**क्रोध लोभा सबाह्याभ्यंतरी। पापकरी निजक्रोध॥**
**क्रोध संचरल्या देहीं। अणुमात्र हित नाही।**
**पापाच्या कोटी पाहीं। क्रोधाच्या पायीं तोडरी॥**

'क्रोध हा कामाचा कैवारी, अभिमानाचा सहाय्यकारी, लोभ अंतर्बाह्य भरलेला, असा हा क्रोध पापकारी असतो. क्रोध देहात संचारला तर अणुमात्र हित नाही. क्रोधाच्या पायात शोभणारा अलंकार म्हणजे पापाच्या कोटी असतात.'

एवढे बोलून जमदग्नींनी योगाग्नी चेतविण्यास आरंभ केला. त्यामुळे गडबडून गेलेला क्रोध घाईघाईने त्यांच्या शरीरातून बाहेर पडला. बाहेर निघता निघता तो जमदग्नींना म्हणाला, 'ऋषिवरा, आपली आज्ञा मानून मी तत्त्वतः आपल्या शरीरातून निघालो खरा, पण आता मी कोठे राहावे?' यावर जमदग्नी ऋषि विचारात पडले. 'माझा क्रोध तर अती दुर्धर आहे. हा राहू शकेल असे ठिकाण तर कुठेच दिसत नाही. मग आता याला काय सांगणार!'



## मत आमचेही

✍ केशव उपाध्ये

# 'कर्तृत्वशून्यते'च्या सापळ्यात काँग्रेस नेतृत्व

**राहुल गांधी महाराष्ट्रातील निवडणूक पराभव पचवू न शकल्याने निवडणूक आयोगावर खोटे आरोप करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाला वारंवार मतदारांनी नाकारले आहे. काँग्रेस संघटनात्मक दुर्बलतेत अडकलेली असून राहुल गांधी अपप्रचारावर भर देतात. अग्निवीर प्रकरणातही त्यांनी खोटी विधाने केली. सत्याऐवजी असत्य कथनावर भर देणारे राहुल गांधी 'कर्तृत्वशून्यते'च्या सापळ्यात अडकले असून जनतेचा विश्वास संपादन करण्यात सातत्याने अपयशी ठरले आहेत.**

काँग्रेसचे राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील निवडणूक निकालावरून निवडणूक आयोगावर आरोपांची राळ उडवणे चालूच ठेवले आहे. महाराष्ट्रातील पराभव राहुल गांधींना पचवता न आल्याने त्यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण मतदारसंघात आठ टक्के मतदार वाढले, असे म्हणत राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर खोट्या आरोपांची मालिका सुरू ठेवली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या आरोपातील हवा काढून घेताना काँग्रेस-राष्ट्रवादीच्या आमदारांच्या मतदारसंघात झालेल्या मतदारवाढीची आकडेवारीच सादर केली. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर उबाठा, ज्येष्ठ नेते शरद पवार आणि काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे स्वप्नभंग झाले.

लोकसभा निवडणुकीच्या यशामुळे महाविकास आघाडीचे नेते विधानसभा निवडणूक जिंकल्याच्या तोऱ्यात वावरत होते. लोकसभा निवडणुकीतील यश हा अपघात होता, हे मानण्यास महाविकास आघाडीचे नेते तयारच नव्हते. राजकारणात असे अपघात वारंवार घडत नसतात, याचा शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यालाही विसर पडला. लोकसभा निवडणुकीत ९९ जागा मिळाल्यामुळे युवराज राहुल गांधींचे विमान भलतेच वर गेले होते. ९९ जागा मिळणे हा आपल्या नेतृत्वाचा विजय आहे, अशा भ्रमात वावरणाऱ्या राहुल गांधींनी स्वतःबद्दल अनेक गैरसमज करून घेतले आहेत.

संविधान बदलाचा अपप्रचार, शहरी नक्षलवादी शक्तींनी अनेक समाजघटकांमध्ये निर्माण केलेले दहशतीचे वातावरण याचा परिणाम लोकसभा निवडणुकीवर झाला. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसने वाटलेले फॉर्मचे प्रकरण निकालानंतर उजेडात आले. लोकसभा निवडणुकीनंतर हरयाणा विधानसभेची निवडणूक झाली. त्या निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला पुन्हा धक्का दिला. हरयाणाच्या



निवडणुकीत संविधान बदलाच्या अपप्रचारातील हवा निघून गेली होती.

निवडणुकीतील विजयासाठी संघटनात्मक बाजूकडे विशेषत्वाने मेहनत घ्यावी लागते. नवीन मतदारांची नोंदणी, जुन्या मतदार यादीतील नावांतील दुरुस्त्या, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या तरुणांची मतदार म्हणून नोंदणी, मयत मतदारांची नावे वगळणे अशा अनेक गोष्टींकडे संघटनेला लक्ष द्यावे लागते. काँग्रेसच्या संघटनेला अनेक वर्षांत अशा मुद्द्यांकडे लक्ष देण्याची सवयच राहिलेली नाही.

इंदिरा गांधी यांच्या वलयामुळे १९७१, १९८० अशा दोन निवडणुकांमध्ये काँग्रेसला लोकसभा निवडणुकीमध्ये तसेच अनेक राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही मोठे बहुमत मिळत असे. १९७० च्या दशकापर्यंत काँग्रेसची संघटना गल्लीपासून दिल्लीपर्यंत लक्षणीय प्रमाणात सक्रिय होती. पक्ष सदस्य नोंदणी, नेते-कार्यकर्त्यांसाठी अभ्यास शिबिरे असे अनेक उपक्रम काँग्रेसकडून होत असत. इंदिरा गांधी यांनी काँग्रेसची पक्ष संघटना हळूहळू संपवून टाकली. नेहरू-गांधी घराण्याची हुजरेगिरी करणाऱ्या मंडळींना सरकारमध्ये आणि संघटनेमध्ये मानाचे पान मिळू लागले.

पंडित नेहरूंच्या कृपेमुळे इंदिरा गांधींना काँग्रेसमध्ये महत्त्वाचे स्थान मिळाले. मात्र त्यानंतर आपले नेतृत्व प्रस्थापित करताना इंदिरा गांधींना मोठा संघर्ष करावा लागला. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीमध्ये मतदारांनी झटका दिल्यानंतर इंदिरा गांधी जनतेत पुन्हा गेल्या. राहुल गांधींना या पद्धतीने संघर्ष करत राजकारण करण्याची सवय नाही. त्यामुळे त्यांनी निवडणूक आयोगावर आरोपांची राळ उडवण्याचा एककलमी कार्यक्रम हाती घेतला आहे. यातून त्यांना आपल्या नेतृत्वातील दोषांवर पांघरूण घालायचे आहे.

इंदिरा गांधी यांनी जनता पक्षातील मतभेदांमुळे मतदारांमध्ये असलेली नाराजी ओळखली. याच मुद्द्याचा वापर करत इंदिरा गांधींनी मतदारांना साद घातली. राहुल गांधींचे नेतृत्व मतदारांना काँग्रेसकडे आकृष्ट करण्यास वारंवार अपयशी ठरले आहे. राहुल गांधींना मतदारांमध्ये आपल्या नेतृत्वाबद्दल विश्वासार्हता निर्माण करण्यात सातत्याने अपयश येत आहे. २०१२च्या उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी काँग्रेसचे मुख्य प्रचारक होते. तेव्हापासून आतापर्यंत राहुल गांधींना मतदारांनी सातत्याने नाकारले आहे. कर्नाटक, तेलंगणा या राज्यांमध्ये स्थानिक नेतृत्वाने केलेल्या संघर्षामुळे काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत विजय मिळाला आहे. या विजयात राहुल गांधींचे काहीच योगदान नाही.

मतदार आपल्याला सातत्याने का नाकारत आहेत, याची कारणे शोधून त्याप्रमाणे आपल्या वर्तनात बदल करण्याऐवजी राहुल गांधींनी अपप्रचाराचा कुटील मार्ग स्वीकारला आहे. धादांत खोटी माहिती प्रसारित करून मतदारांमध्ये अस्वस्थता, असंतोष निर्माण करण्याचा राहुल गांधी यांचा प्रयत्न आहे. काही महिन्यांपूर्वी राहुल गांधींनी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेताना असत्य कथनाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. चर्चेदरम्यान राहुल गांधींनी अग्निवीर योजनेवर प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारच्या अग्निवीर योजनेत हुतात्मा दर्जा दिला जात नाही, याशिवाय हुतात्मा झालेल्या अग्निवीर जवानांच्या कुटुंबीयांनाही मदत दिली जात नाही, असा आरोप केला होता.

यावेळी राहुल गांधींनी बुलढाण्यातील हुतात्मा अग्निवीर अक्षय गवते याचा उल्लेख केला होता. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी राहुल गांधी यांचा आरोप सपशेल खोटा असल्याचे लोकसभेतच सांगितले. तसेच राहुल गांधी यांच्या दाव्यानंतर हुतात्मा अग्निवीरचे वडील लक्ष्मण गवते यांनी त्यांना आतापर्यंत एकूण एक कोटी दहा लाख रुपयांची मदत मिळाल्याचे सांगितले. त्यानंतरही राहुलबाबांनी आपला 'असत्य कथन'चा घेतलेला वसा चालूच ठेवला.

'सत्य की रक्षा हर धर्म का आधार है!' असे म्हणत राहुल गांधींनी हुतात्मा अग्निवीर अजय सिंह यांच्या कुटुंबीयांना लष्कराकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळाले नसल्याचा दावा एक्स या समाजमाध्यमावर केला होता. राहुल गांधींनी हा दावा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अजय सिंह याच्या वडिलांनी लष्कराकडून आपल्याला भरपाई मिळाल्याचे स्पष्ट केले. या मुद्द्यावरून राजकारण करू नका, अशी विनंती करणारा अजय सिंह यांचे वडील चरणजीत काला यांचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला होता.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून राहुल गांधींनी जनतेमध्ये सरकारविषयी, व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण व्हावा, संशय निर्माण व्हावा, या एकमात्र हेतूने खोटी माहिती पसरवण्याचा उद्योग चालू ठेवला आहे. निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या प्रत्येक प्रश्नाचे तपशीलवार, मुद्देसूद उत्तर दिले आहे. तरीही त्यांनी आपले असत्य कथन बंद केलेले नाही. जनतेत जाऊन संघटना बांधण्याचा, संघर्ष करण्याचा लढाऊ मार्ग स्वीकारण्याऐवजी राहुल गांधी यांनी हा मार्ग निवडला आहे. अंगी काहीच कर्तृत्व नसल्यामुळे असत्य कथनाच्या सापळ्यात ते अडकले आहेत. त्यातून बाहेर पडणे त्यांना अवघड झाले आहे.

**मुख्य प्रवक्ते, महाराष्ट्र प्रदेश भाजप**



## लक्षवेधी

✍ डॉ. संजय मंगला गोपाळ

# हिंदीसक्ती मागे, तरी सजग राहावे लागेल!

**पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावरच प्रचंड बहुमताच्या सरकारला 'पहिलीपासून हिंदी सक्तीचा' निर्णय जनरेट्यासमोर मागे घ्यावा लागला; मात्र एकीकडे माघार तर दुसरीकडे जनसुरक्षा विधेयक किंवा शक्तिपीठ महामार्ग यासारखे घातक निर्णय रेटण्याचा प्रयत्न सरकार पावसाळी अधिवेशनात करेल. रस्त्यावरच्या आणि वेळ पडल्यास न्यायालयीन लढाईस जनतेने सज्ज रहावे!**

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावरच विरोधकांसोबतच्या चहापानाआधी सरकारला पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषेच्या सक्तीचे अध्यादेश मागे घ्यावे लागले. मागील विधानसभा निवडणुकीत केंद्रातील सत्तेचा गैरवापर करत पाशवी बहुमताने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारला पुन्हा एकदा जनरेट्यासमोर सपशेल माघार घ्यावी लागली. विरोधी पक्षांबरोबरीनेच नव्हे तर त्यांच्याही पुढे जात सामान्य मराठी भाषिक जनता, लोकशाहीवादी संस्था-संघटना व कणा असलेले साहित्यिक-कलाकार यांच्या पुढाकारामुळे मायबोलीच्या स्वाभिमानाचा डंका सर्वत्र वाजवण्यात महाराष्ट्र जनतेला यश मिळाल्याचे हे द्योतक आहे. मात्र हे सरकार अत्यंत धूर्त, धोरणी व वेळप्रसंगी कावेबाज पद्धतीने वागणाऱ्यांच्या हातात आहे, हे लक्षात घेता हिंदीसक्ती मागे घेत त्या बदल्यात अन्य काही चुकीचे निर्णय या अधिवेशनात करवून घेण्याचा घाट सरकारने घातला आहे की काय, अशी शंका घेण्यास जागा दिसते आहे.

मागील विधानसभा अधिवेशनात ज्या विधेयकाचा पुनरुच्चार झाला, जे विधेयक या आधीच्या विधानसभेच्या शेवटच्या अधिवेशनात रेटण्याचा त्यावेळच्या शिंदे सरकारमधील गृहमंत्री फडणवीसांचा प्रयत्न विरोधकांनी हाणून पाडला. पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारच्या फडणवीस सरकारने पुन्हा एकदा तेच जनसुरक्षा विधेयक आणले. विरोधकांपाशी संख्याबळ नसल्याने ते विधेयक जरी रोखता आले नसले तरी ते विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे पाठवण्याचा निर्णय करून घेण्यात विरोधकांना यश मिळाले. विधेयकाबाबत जनतेच्या हरकती मागवण्याची सूचना प्रकाशित झाल्यावर राज्यातील लोकशाहीप्रेमी व संविधानवादी विरोधी राजकीय पक्ष, शेकडो संघटना, जनआंदोलने, संस्था व संवेदनशील व्यक्तींनी समितीकडे हरकतींचा पाऊस पाडला. सरकारनेच जाहीर केल्याप्रमाणे विधेयकावर रेकॉर्ड ब्रेकिंग १३ हजार सूचना आल्या. इतके होऊनही हे विधेयक संमत करण्याचा सरकारचा हेका काही कमी झालेला नाही. वर संविधानविरोधी आग्रह संविधानिकच असल्याचा कांगावा करण्यात सत्ताधारी भाजप हुशार आहे. जनसुरक्षा विधेयकाचीही हीच कथा आहे. जनसुरक्षेचे जरी नाव असले तरी वास्तवात सरकारने कितीही गैरसंविधानिक वा जनविरोधी व अन्यायकारक वर्तन केले तरी त्या विरोधात जनआंदोलन उभे राहू नये ही दक्षता म्हणून हे 'सत्ताधारी सुरक्षा विधेयक' आणले जात आहे. ज्या मोजक्या भाजपशासित राज्यांमध्ये अशाप्रकारचे कायदे करण्यात आले आहेत तिथे विरोधकांची मुस्कटदाबी सुरू आहे. विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे विधेयकावर जाहीर व खुली जनसुनवाई घेण्याची आग्रही सूचना हजारोंच्या संख्येने करण्यात आली; मात्र खुलेपणा, व्यापक चर्चा व लोकशाही संकेत यांचं केवळ वावडंच नव्हे, तर प्रचंड भीती असणाऱ्या या सरकारने या जनसहभागाच्या न्यायसंगत मागणीलाही वाटाण्याच्या अक्षता लावल्या. वर कडव्या डाव्या विचारांच्या संघटनांचा प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी हे विधेयक आणले आहे, असा कांगावाही केलाय. साऱ्या जगाला हे ठाऊक आहे की समाजातील वंचित, पीडित, दुर्लक्षित, शोषित घटकांच्या न्याय्य मागण्यांकडे लक्ष वेधण्याचे काम डाव्या व समाजवादी संघटना करत असतात. हे विधेयक आपल्या बहुमताच्या जोरावर रेटल्यानंतर, सरकारच्या विरोधात साधा मोर्चा काढणेही दूर, नुसते न्याय सुसंगत व सरकारच्या विसंगत वर्तणुकीबाबत प्रश्न विचारले, तरी संबंधितांना विना जामीन अटकेत टाकण्याचा अनिर्बंध अधिकार सरकारला मिळणार आहे. अशावेळी या अन्यायाविरुद्ध जनतेचा आवाजही उठू न देण्याची तजवीज या विधेयकाद्वारे साधलेली आहे. हरकती, सूचना, विरोध यांचा ढीग रचला तरी तो बेदखल करत हा कायदा या अधिवेशनात मांडण्याची पूर्ण तयारी सरकारने केलेली आहे. अशावेळी, या कायद्याच्या गैरसंविधानिक व गैरलोकतांत्रिक असण्याच्या मुद्द्यावरून, लोकशाहीची चाड असणाऱ्या जनतेला लढाई जारी ठेवावी लागणार आहे. या कायद्याच्या वैधतेला न्यायालयात आव्हान द्यावे लागणार आहे.

राज्य सरकारने असाच दुसरा एक विघातक डाव टाकला आहे, शक्तिपीठ महामार्गाचा! ८० हजार करोड रुपयांच्या या प्रकल्पाद्वारे नागपूर ते गोवा असा सहा पदरी महामार्ग टाकण्याचे नियोजन आहे. या महामार्गाची आखणी करताना राज्यातील महत्त्वाची हिंदूधर्मीय १८ तीर्थक्षेत्रे जोडण्यातून धार्मिक पर्यटनाला बळ देण्याचा प्रयत्न आहे. मागील लोकसभा निवडणुकीत या प्रकल्पाच्या क्षेत्रातील बहुतेक लोकसभा जागांवर महायुतीला सपशेल हार पत्करावी लागल्यानंतर हा प्रकल्प थंड पेटाऱ्यात बंद करून ठेवण्याची धूर्त चाल सरकारने खेळली. आता तो पुन्हा पुढे रेटण्याचा घाट घालण्यात आला आहे. मागच्याच आठवड्यात राज्य मंत्रिमंडळाने सदर प्रकल्पाच्या आखणी व जमीन अधिग्रहणासाठी २०,७८७ करोड रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी १२ हजार करोड रुपये गृहनिर्माण व शहरविकास महामंडळाकडून उभे करण्यात आले आहेत. एवढा महाकाय प्रकल्प संपूर्णपणे एकाच कंत्राटदाराला देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे साडेआठ हजार हेक्टरहून अधिक जमीन लागणार असून त्यापैकी सुमारे आठ हजार हेक्टरहून अधिक जमीन खासगी मालकीची आहे. या खासगी मालक शेतकऱ्यांना आपली उपजाव व दरवर्षी नगदी पिके देणारी जमीन हातातून जाऊ देण्यास ठाम विरोध आहे. या महामार्गाबाबत अजून एका अडचणीच्या मुद्द्याकडे टीकाकार लक्ष वेधत आहेत. नागपूर-रत्नागिरी महामार्ग अलीकडेच विस्तारण्यात आलेला असताना, पुन्हा या महामार्गाचा घाट घालणे निरर्थक आहे.

या महामार्गासमोरची सर्वात बिकट वाट असणार आहे ती या महामार्गासाठीचा अव्वाच्या सव्वा आर्थिक भार उचलण्यासाठी, राज्य सरकार सक्षम आहे का? राज्याच्या अर्थखात्याने या संदर्भात आधीच आपले हात वर करत या प्रकल्पात गंभीर वित्तीय जोखीम असल्याचा अहवाल दिला आहे. या प्रकल्पासाठी बाजारात ६.७५ टक्के दराने बॉन्ड्सच्या माध्यमातून निधी उभारणी शक्य असताना, यासाठी ८.७५ टक्के दराने कर्ज घेण्याचा प्रस्तावही वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. यामुळे राज्याची वित्तीय तूट चार टक्क्यांपेक्षा अधिकने वाढून राज्यावरील कर्ज व राज्याचे एकत्रित उत्पादन यांचे प्रमाण वित्तीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्याप्रमाणे २५ टक्क्यांच्या धोक्याच्या पातळीपार जाईल, असा इशारा अहवालात पुढे दिलेला आहे. राज्याच्या निकडीच्या प्रकल्पांना प्राधान्य देणे गरजेचे असून, अशाप्रकारचे प्रकल्प रेटत राहिले तर राज्याच्या आवश्यक प्रकल्पांसाठी व सरकारची प्राथमिक जबाबदारी असलेल्या कामांसाठी खर्च करायला सरकारकडे दमडीही शिल्लक राहणार नाही! 'कॉर्पोरेट मालामाल व सामान्य जनता कफल्लक' व त्याविरुद्ध लढणाऱ्यांवर नाहक 'जनसुरक्षा' असे घडू न देण्यासाठी, जनतेस सजग रहावे लागेल!

**जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाच्या राष्ट्रीय कार्यगटाचे सदस्य**

sansahil@gmail.com

## जनमनाचा कानोसा

### हिंदीसक्ती कायमचीच रद्द करावी

**राज्यातील** हिंदीसक्तीचे दोन्ही शासननिर्णय रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली, हे निश्चितच जनभावनांचा आदर करणारे पाऊल आहे. पण त्याच वेळी "हा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला होता" अशी टिप्पणी करत त्यांनी त्या चुकीच्या निर्णयाची जबाबदारी पूर्वीच्या सरकारवर ढकलण्याचा प्रयत्न केला, हे लक्षात घेण्यासारखे आहे. गंमत म्हणजे महाविकास आघाडीच्या काळातील अनेक निर्णय महायुती सरकारने अगोदरच रद्द केले आहेत. उदाहरणार्थ - मेट्रो कारशेड कांजूरमार्गातून परत आरेत हलवण्याचा निर्णय, कर्जमाफी योजनेतील अटींमध्ये बदल - हे सगळे निर्णय ठामपणे रद्द करता आले, तर हिंदीसक्तीसारखा भावनिक मुद्दा का राबवला गेला? खरे तर, जनतेतून तीव्र विरोध झाला नसता, तर हा निर्णय यशस्वीपणे राबवण्यात आला असता, हे उघड आहे. त्यामुळे जेव्हा काही निर्णय जनक्षोभाची धग निर्माण करतात, तेव्हा त्याची जबाबदारी आधीच्या सरकारवर फेकून स्वतःला नामानिराळे करणे, हाच का 'फडणवीसांच्या चाणक्यनीती'चा अर्थ? आता नव्याने समित्या स्थापन करून वेळ काढण्याचा उद्योग करण्याऐवजी, सरकारने स्पष्ट, ठाम आणि दीर्घकालीन भूमिका घ्यावी आणि हिंदीसक्तीचा निर्णय तात्पुरता नव्हे, तर कायमचा रद्द करावा, हीच अपेक्षा.

- **दीपक गुंडये**, वरळी

### यात्रा-उत्सव आणि सामान्यांचा बळी

**जगन्नाथ** रथयात्रेसारख्या भव्य धार्मिक सोहळ्यांमध्ये प्रत्येकवर्षी लाखो श्रद्धावान सहभागी होतात. श्रद्धा, आस्था, परंपरा यांचे दर्शन घडवणाऱ्या या यात्रा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. परंतु, या आस्थेच्या महासागरात अनेकदा गोंधळ, अपघात, चेंगराचेंगरी, उष्माघात, वाऱ्यावर सोडलेली आरोग्य व सुरक्षाव्यवस्था अशा भीषण घटनांचा मारा सामान्यांवरच होतो. यंदाही पुरी येथे पार पडलेल्या जगन्नाथ रथयात्रेदरम्यान अनेक भाविकांना आपले प्राण गमवावे लागले. ही घटना अपवाद म्हणून बघता येणार नाही, कारण जवळपास प्रत्येक मोठ्या धार्मिक यात्रेच्या वेळी अशाच प्रकारे सामान्यांचा बळी जातो. यात्रा ही आनंदाची, आध्यात्मिक समाधान देणारी असावी; मृत्यूच्या छायेत ढकलणारी नाही. यात्रेचे आयोजन करणाऱ्या मंडळांनी केवळ धार्मिक विधींमध्ये नव्हे, तर सुरक्षेच्या बाबतीतही जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. मग प्रश्न उरतो अशा वेळी अपयशी ठरणारी व्यवस्था जबाबदारी स्वीकारणार तरी कधी?

- **सागर पिंगळे**, पुणे

### बोध कधी घेणार?

**कुंभमेळा,** तिरुपती, खारघरचा महाराष्ट्र भूषण सोहळा, चिन्नास्वामी स्टेडियम इत्यादी ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनांचा विसर पडत नाही, तोवर जगन्नाथ रथयात्रेत चेंगराचेंगरी होऊन तीन भाविकांचा मृत्यू व ५० हून अधिक जखमी, हे वृत्त वाचनात आले. यात दोष कुणाचा? आयोजकांचा, की तथाकथित अतिउत्साही दास, भक्त, चाहते यांचा? की यंत्रणांच्या अक्षम्य ढिलाईचा? की मागच्या अनुभवांनंतरही काहीही न शिकणाऱ्या लोकांचा? एखाद्या ठिकाणी प्रचंड गर्दी होणे अपेक्षित असल्यास तेथे जाणे टाळावे, जीवावर बेतू शकते - हा बोध लोक कधी घेणार?

- **बकुल बोरकर**, विलेपार्ले

## बाजारभाव

| | |
|---|---|
| सोने | ₹ ९५,८८६ (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ १,०५,५१० (१ किलो) |
| डॉलर | ₹ ८५.७३ -२३ पैसे |
| सेन्सेक्स | ८३,६०६.४६ -४५२.४४ |
| निफ्टी | २५,५१७.०५ -१२०.७५ |

# जीएसटी ५ वर्षांत २२.०८ लाख कोटींवर

## आर्थिक वर्ष २०२१ ते २०२४-२५ मध्ये दुप्पट वाढ

**नवी दिल्ली :** आर्थिक वर्ष २०२१ मधील ११.३७ लाख कोटी रुपयांवरून २०२४-२५ आर्थिक वर्षात एकूण जीएसटी संकलन दुप्पट होऊन २२.०८ लाख कोटी रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले.



२०२४-२५ मध्ये एकूण वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाने २२.०८ लाख कोटी रुपयांची सर्वोच्च पातळी गाठली, जी मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ९.४ टक्के वाढ नोंदवते. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सरासरी मासिक संकलन १.८४ लाख कोटी रुपये होते, जे आर्थिक वर्ष २४ मध्ये १.६८ लाख कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २२ मध्ये १.५१ लाख कोटी रुपये होते.

आठ वर्षांत, जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत करदात्यांची संख्या २०१७ मध्ये ६५ लाखांवरून १.५१ कोटींहून अधिक झाली आहे. जीएसटी लागू झाल्यापासून वस्तू आणि सेवा कराने महसूल संकलनात आणि कर पाया विस्तारात मोठी वाढ दर्शविली आहे. त्यामुळे भारताची आर्थिक स्थिती स्थिरपणे मजबूत झाली आहे आणि अप्रत्यक्ष कर अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक झाला आहे, असे जीएसटीच्या आठ वर्षांवरील सरकारी निवेदनात म्हटले आहे.

२०२४-२५ मध्ये जीएसटी संकलन २२.०८ लाख कोटी रुपयांचा आतापर्यंतचा सर्वोच्च सकलन झाले असून वार्षिक आधारावर ९.४ टक्के वाढ दर्शविते. २०२३-२४ आणि २०२२-२३ मध्ये जीएसटी संकलन २०.१८ लाख कोटी रुपये आणि २०२२-२३ मध्ये १८.०८ लाख कोटी रुपये होता. २०२१-२२ मध्ये, एकूण सकल जीएसटी ११.३७ लाख कोटी रुपये जमा झाले होते आणि सरासरी मासिक संग्रह ९५,००० कोटी रुपये होता.

१ जुलै २०१७ रोजी सुरू झालेल्या जीएसटीला सोमवारी आठ वर्षे पूर्ण होत आहेत. जीएसटीने सुमारे १७ स्थानिक कर आणि १३ उपकर पाच-स्तरीय रचनेत समाविष्ट केले. त्यामुळे कर व्यवस्था सोपी झाली. एप्रिल २०२५ मध्ये मासिक जीएसटी संकलन २.३७ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचले होते. मे २०२५ मध्ये ते २.०१ लाख कोटी रुपये होते. जून महिन्याचे आकडे मंगळवारी जाहीर केले जातील.

# जीएसटीमध्ये पेट्रोलियम उत्पादनांचा समावेश करा

## कर टप्पे कमी करण्याचा पीडब्ल्यूसीचा सल्ला । जीएसटीला आज ८ वर्षे पूर्ण

**नवी दिल्ली :** केंद्र आणि राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा समावेश असलेल्या जीएसटी परिषदेने नियम सोपे करावे, कर स्लॅब तीन पर्यंत कमी करावे आणि पेट्रोलियम उत्पादने जीएसटीअंतर्गत आणून करजाळे वाढवावे, असे पीडब्ल्यूसी इंडियाच्या अहवालात सोमवारी म्हटले आहे.

१ जुलै २०१७ रोजी सुरू झालेल्या वस्तू आणि सेवा कराला (जीएसटी) सोमवारी आठ वर्षे पूर्ण होत आहेत. जीएसटीने सुमारे १७ स्थानिक कर आणि १३ उपकर पाचस्तरीय रचनेत समाविष्ट केले आहेत, ज्यामुळे कर व्यवस्था सुलभ झाली आहे.

गेल्या ८ वर्षांत, सरासरी मासिक जीएसटी संकलन २०१७-१८ मध्ये ९०,००० कोटी रुपयांवरून वाढून २०२४-२५ (एप्रिल-मार्च) मध्ये १.८४ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. एप्रिल २०२५ मध्ये कर संकलनाने २.३७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला.

भारतात जीएसटी आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे जिथे जागतिक व्यापार गतीशी सुसंगत राहणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विकसित होत असलेले परिदृश्य, उत्पादन आणि जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करण्याच्या वाढत्या गरजेसह, चपळ, गुंतवणूकदार-अनुकूल आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक असलेल्या जीएसटी चौकटीची आवश्यकता आहे, असे पीडब्ल्यूसी अहवालात म्हटले आहे.



### दर टप्प्याचा व्यापक आढावा घ्या

इनपूटवरील जीएसटी दर आणि आऊटपूटवरील जीएसटी दरांमधील तफावत कमी करण्यासाठी जीएसटी दर स्लॅबचा व्यापक आढावा घेणे आवश्यक आहे, विशेषतः इलेक्ट्रॉनिक वाहन, विमान वाहतूक आणि ई-कॉमर्ससारख्या क्षेत्रांसाठी, ज्यांना उलट्या कर रचनेमुळे क्रेडिट संचयनाचा सामना करावा लागतो. पीडब्ल्यूसीने पेट्रोलियम उत्पादनांवर जीएसटी आकारण्याचा मुद्दा देखील मांडला, ज्याची सुरुवात एव्हिएशन टर्बाइन इंधनपासून व्हावी, जेणेकरून उद्योगाची रोख प्रवाहाची समस्या दूर होईल.

सध्या, जीएसटी ही चारस्तरीय कर रचना आहे ज्यामध्ये ५, १२, १८ आणि २८ टक्के टप्पे आहेत. लक्झरी आणि डिमेरिट वस्तूंवर २८ टक्के या सर्वोच्च पातळीवर कर आकारला जातो, तर पॅक केलेले अन्न आणि आवश्यक वस्तू सर्वात कमी ५ टक्के स्लॅबवर आहेत. चारस्तरीय दर रचनेत संक्रमण केल्याने व्याख्यात्मक विवाद कमी होतील, कर निश्चितता सुधारेल आणि नियमांचे पालन करणे सोपे होईल, असे पीडब्ल्यूसीने म्हटले आहे.

पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू आणि इतर पेट्रोलियम उत्पादने जीएसटी व्यवस्थेतून वगळण्यात आली आहेत आणि केंद्रीय उत्पादन शुल्क आणि राज्य व्हॅटच्या अधीन आहेत. राज्ये आणि केंद्राच्या अर्थमंत्र्यांचा समावेश असलेल्या जीएसटी परिषदेच्या विशिष्ट शिफारसीनुसारच अशी उत्पादने जीएसटीच्या कक्षेत आणता येतील. विशेषतः राज्यांना प्राथमिक चिंता अशी आहे की, या वस्तूंना जीएसटी अंतर्गत समाविष्ट केल्याने महसुलात तूट येईल.

या वस्तूंचा जीएसटी अंतर्गत समावेश करणारा धोरणात्मक बदल, राज्यांच्या महसूलाचे संरक्षण करण्यासाठी एक प्रणाली, कर संरचना सुलभ करेल, व्यवसायांसाठी रोख प्रवाह समस्या कमी करेल आणि जीएसटीच्या मूळ उद्दिष्टांना पाठिंबा देईल, असे अहवालात पुढे म्हटले आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत, राज्यांनी एटीएफ म्हणजेच जेट इंधन जीएसटी अंतर्गत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव नाकारला होता.

## औद्योगिक उत्पादन वाढ ९ महिन्यांच्या नीचांकी

**नवी दिल्ली :** उत्पादन, खाणकाम आणि वीज क्षेत्रांच्या खराब कामगिरीमुळे मे २०२५ मध्ये भारताची औद्योगिक उत्पादन वाढ नऊ महिन्यांच्या नीचांकी १.२ टक्क्यांपर्यंत मंदावल्याचे सोमवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीत दिसून आले. औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) मे २०२४ मध्ये ६.३ टक्क्यांनी वाढले होते.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) एप्रिलमध्ये औद्योगिक उत्पादन वाढ गेल्या महिन्यात जाहीर केलेल्या २.७ टक्क्यांपेक्षा २.६ टक्क्यांनी वाढली आहे. उत्पादन क्षेत्राची वाढ मे २०२५ मध्ये २.६ टक्क्यांपर्यंत घसरली आहे, जी मागील वर्षीच्या याच महिन्यात ५.१ टक्क्यांपेक्षा कमी होती. खाण उत्पादनात ०.१ टक्क्यांनी घट झाली, जी गेल्या वर्षी ६.६ टक्के होती. मे २०२५ मध्ये वीज उत्पादनात ५.८ टक्क्यांपर्यंत घट झाली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीत १३.७ टक्के होती. आर्थिक वर्ष २६ च्या एप्रिल-मे या कालावधीत, औद्योगिक उत्पादनात १.८ टक्क्यांनी वाढ झाली, जी गेल्या वर्षी ५.७ टक्के होती.

## निवडक

### वित्तीय तुटीची उद्दिष्टाच्या ०.८ टक्क्यांपर्यंत घसरण

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या २.६९ लाख कोटी रुपयांच्या लाभांशामुळे मे महिन्याच्या अखेरीस केंद्र सरकारची वित्तीय तूट पूर्ण वर्षाच्या उद्दिष्टाच्या ०.८ टक्क्यांपर्यंत घसरली. वित्तीय तूट एप्रिलमध्ये २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ११.९ टक्के किंवा १.८६ लाख कोटी रुपयांवर पोहोचली होती. आरबीआयच्या लाभांश देयकानंतर, केंद्राची वित्तीय तूट २०२५-२६ च्या अंदाजपत्रकाच्या ०.८ टक्के किंवा १३,१६३ कोटी रुपयांपर्यंत कमी झाली, असे लेखा नियंत्रक (सीजीए) ने जारी केलेल्या आकडेवारीत दिसून आले आहे. केंद्राचा अंदाज आहे की, २०२५-२६ मध्ये वित्तीय तूट जीडीपीच्या ४.४ टक्के किंवा १५.६९ लाख कोटी रुपये असेल.

### कर्करोगावर जेनेरिक इंजेक्शन उपलब्ध

**नवी दिल्ली :** अलेम्बिक फार्मास्युटिकल्सने सोमवारी सांगितले की, त्यांना विविध प्रकारच्या कर्करोगात त्यांच्या जेनेरिक डॉक्सोरुबिसिन हायड्रोक्लोराइड लिपोसोम इंजेक्शनसाठी अमेरिकन आरोग्य नियामकांकडून अंतिम मान्यता मिळाली आहे. त्यामुळे कर्करोग रुग्णांना दिलासा मिळेल. अलेम्बिक फार्मास्युटिकल्सने वेदनात म्हटले आहे की, २० मिलीग्राम/१० एमएल (२ मिलीग्राम/एमएल) आणि ५० मिलीग्राम/२५ एमएल (२ मिलीग्राम/एमएल) सिंगल-डोसच्या नवीन डॉक्सोरुबिसिन हायड्रोक्लोराइड लिपोसोम इंजेक्शनसाठी (एएनडीए) साठी यूएस फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनकडून मान्यता मिळाली आहे.

### व्यापार चर्चेसाठी भारतीय पथकाने मुक्काम वाढवला

**नवी दिल्ली :** वाणिज्य विभागातील विशेष सचिव राजेश अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील भारतीय पथक अमेरिकेसोबतच्या अंतरिम व्यापार करारावर वाटाघाटी करण्यासाठी सोमवारपर्यंत वॉशिंग्टनमध्ये राहील, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. भारतीय अधिकाऱ्यांचा मुक्काम तीन दिवसांनी ३० जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. सुरुवातीला, २६ जूनपासून सुरू झालेल्या चर्चेसह शिष्टमंडळ दोन दिवस राहणार होते.

### लष्करी खर्च जीडीपीच्या ३ टक्के करावा : ईवाय

**नवी दिल्ली :** भारताने लष्करी खर्च जीडीपीच्या ३ टक्के करावा आणि हा निधी व्यपगत न होता संरक्षण आधुनिकीकरण निधी तयार करण्याचा विचार करावा. तसेच देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन द्यावे, असे ईवाय अहवालात सोमवारी म्हटले आहे. 'ईवाय इकॉनॉमी वॉच'च्या जून आवृत्तीत भविष्यकालीन संरक्षण अर्थसंकल्प धोरणाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे अधिक लवचिक आणि प्रतिसाद देणारी संरक्षण पायाभूत सुविधा निर्माण होतील.

# नफावसुली : चार दिवसांची तेजी थांबली

## बँकिंग शेअर्सची विक्री, सेन्सेक्स ४५२ अंकांनी घसरला

**मुंबई :** नफावसुली प्रामुख्याने बँक शेअर्समध्ये झाल्याने चार दिवसांच्या तेजी सोमवारी थांबली. त्यामुळे सेन्सेक्स ४५२ अंकांनी घसरला.

दिवसभर नकारात्मक क्षेत्रात राहिल्यानंतर, बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स नंतर ४५२.४४ अंकांनी किंवा ०.५४ टक्क्यांनी घसरून ८३,६०६.४६ वर बंद झाला. दिवसभरात तो ५७६.७७ अंकांनी किंवा ०.६८ टक्क्यांनी घसरून ८३,४८२.१३ वर पोहोचला होता. एनएसईचा निफ्टी १२०.७५ अंकांनी किंवा ०.४७ टक्क्यांनी घसरून २५,५१७.०५ वर बंद झाला.

सेन्सेक्सवर्गवारीत ॲक्सिस बँक, कोटक महिंद्रा बँक, मारुती, अल्ट्राटेक सिमेंट, बजाज फायनान्स, आयसीआयसीआय बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, टाटा स्टील, भारती एअरटेल आणि एचडीएफसी बँक यांचे समभाग घसरले. तथापि, ट्रेंट, स्टेट बँक ऑफ इंडिया, भारत इलेक्ट्रॉनिक्स, टायटन आणि बजाज फिनसर्व यांचे समभाग वधारले.



### अस्थिरता कायम

अमेरिकन सरकारसोबतच्या टॅरिफवर लक्ष केंद्रित केले जाईल, कारण त्याची अंतिम मुदत जवळ येत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये अनिश्चितता निर्माण होऊ शकते. अस्थिरता कायम राहील, परंतु भारताच्या मजबूत वाढीच्या शक्यतांमुळे घसरण कमी होईल, असे मेहता इक्विटीजचे प्रशांत तापसे म्हणाले.

बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक ०.८१ टक्क्यांनी वधारला आणि मिडकॅप निर्देशांक ०.६७ टक्क्यांनी वधारला. बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये रिअल्टी ०.८७ टक्के, बँकेक्स (०.५९ टक्के), वाहन (०.४९ टक्के), धातू (०.४९ टक्के), तेल आणि वायू (०.१९ टक्के) आणि वित्तीय सेवा (०.१७ टक्के) घसरले. तर भांडवली वस्तू १.१० टक्के, सेवा (१.०८ टक्के), औद्योगिक (०.६६ टक्के), आरोग्यसेवा (०.५६ टक्के) आणि ग्राहकोपयोगी वस्तू (०.४२ टक्के) वाढले.

गेल्या आठवड्यात मजबूत जागतिक संकेत आणि देशांतर्गत संस्थांच्या खरेदीमुळे बाजारात मोठी तेजी दिसून आली होती, तथापि, नफावसुलीमुळे आज निर्देशांक घसरले.

गेल्या चार सत्रांत सेन्सेक्सने २,१६२.११ अंकांनी किंवा २.६४ टक्के वाढ केली आणि निफ्टीने ६६५.९ अंकांनी किंवा २.६६ टक्के वाढ केली. शुक्रवारी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १,३९७.०२ कोटी रुपयांच्या इक्विटी खरेदी केल्या, असे एक्स्चेंज डेटा सांगतो. जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड ०.१५ टक्क्यांनी घसरून ६७.६७ डॉलर प्रति बॅरल झाला. शुक्रवारी सेन्सेक्स ३०३.०३ अंकांनी वाढून ८४,००० ची पातळी पुन्हा मिळवून ८४,०५८.९० वर तर निफ्टी ८८.८० अंकांनी वाढून २५,६३७.८० वर पोहोचला होता.

# सरकारी बँकांचा क्रेडिट कार्ड एनपीए १४.३ टक्क्यांपर्यंत वाढला

**मुंबई :** सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या क्रेडिट कार्ड पोर्टफोलिओमधील एकूण नॉन-परफॉर्मिंग मालमत्ता (एनपीए) मार्च २०२५ मध्ये १४.३ टक्क्यांपर्यंत वाढली आहे, जी सहा महिन्यांपूर्वी १२.७ टक्क्यांवरून वाढली होती, असे आरबीआयने सोमवारी एका अहवालात म्हटले आहे. या उलट खासगी बँका बरीच चांगली कामगिरी करत असल्याचे दिसून येते. क्रेडिट कार्ड रिसीव्हेबल श्रेणीतील जीएनपीए याच कालावधीत २.१ टक्क्यांवर स्थिर राहिले आहेत, असे केंद्रीय बँकेने त्यांच्या अर्धवार्षिक वित्तीय स्थिरता अहवालात (एफएसआर) म्हटले आहे.

### खासगी क्षेत्रातील बँक २.१ टक्क्यांवर स्थिर

अहवालात म्हटले आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी आर्थिक वर्ष २०२५ मध्ये क्रेडिट कार्ड प्राप्तीवरील थकबाकी १९.२ टक्क्यांनी वाढवली, तर खासगी क्षेत्रातील बँकांसाठी ती ११.७ टक्के होती.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी एकूण जीएनपीए २.८ टक्के होता, तर खासगी बँकांसाठी हा दर १.८ टक्के होता.

## पंधरवड्यात बँक कर्जवाढ ४.९ टक्क्यांपर्यंत मंदावली : आरबीआय

मुंबई : ३० मे रोजी संपलेल्या पंधरवड्यात उद्योगांना बँक कर्जवाढ ४.९ टक्क्यांपर्यंत मंदावली असून जे मागील वर्षीच्या याच कालावधीत हा दर तब्बल ८.९ टक्क्यांपर्यंत वाढला होता, असे रिझर्व्ह बँकेने सोमवारी सांगितले. आरबीआयने मे २०२५ साठी ४१ निवडक शेड्युल्ड व्यावसायिक बँकांकडून (एससीबी) गोळा केलेल्या बँक कर्जाची आकडेवारी जारी केली असून सर्व व्यावसायिक बँकांनी केलेल्या एकूण बिगर-अन्न कर्जाच्या सुमारे ९५ टक्के आहे. वार्षिक आधारावर ३० मे २०२५ रोजी संपलेल्या पंधरवड्यात बिगर-अन्न बँक कर्ज वितरण ९.८ टक्क्यांनी वाढले, जे मागील वर्षीच्या (३१ मे २०२४) याच कालावधीत १६.२ टक्के होते. उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जात वार्षिक ४.९ टक्के वाढ झाली, जी मागील वर्षीच्या याच पंधरवड्यात ८.९ टक्के होती. प्रमुख उद्योगांमध्ये, सर्व अभियांत्रिकी, बांधकाम आणि रबर, प्लास्टिक आणि त्यांच्या उत्पादनांना थकबाकी असलेल्या कर्जात वार्षिक ७.५ टक्के वाढ नोंदवली गेली, असे त्यात म्हटले आहे.

# बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनीत १०० हून अधिक वृक्षांची लागवड



**मुंबई :** बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनी, नेरूळ येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने एक भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात कॉलनीमधील रहिवासी, अधिकाऱ्यांनी आणि लहानग्यांनी सहभाग घेत १०० पेक्षा अधिक झाडांची लागवड केली. या कार्यक्रमाचे नेतृत्व कल्याण समितीचे सचिव आणि वरिष्ठ बँक अधिकारी विभव आकाश यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमात समिती सदस्य तसेच सहाय्यक महाप्रबंधक अनुराग, मनोज कुमार, प्रमोद कुमार, विकास डी. सिंग, अमन तसेच चंद्रशेखर, पंकज, रणधीर, अपूर्व, सागर सिन्हा, अविनाश, अनामिका, नूतन, फैज, राजपुत्रा आणि साहू यांच्यासह अनेक समर्पित बँक अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.


# 'कर मूल्यांकनात असंबद्ध प्रश्न टाळा'

**नवी दिल्ली :** केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे (सीबीडीटी) अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी फेसलेस ॲसेसमेंट ऑफिसर्स यांना कठोर निर्देश दिले की, त्यांनी फेसलेस ॲसेसमेंट करताना असंबद्ध प्रश्न उपस्थित करू नयेत, अधिक केंद्रित आणि प्रकरणाशी निगडित योग्य ती छाननी प्रक्रियेची आवश्यकता यावर भर दिला आहे.

अध्यक्ष रवी अगरवाल यांनी आयकर विभागाच्या प्रधान मुख्य आयुक्तांना पत्र लिहून त्यांना निर्देश दिले की, फेसलेस ॲसेसमेंट ऑफिसर्सनी त्यांच्या मूल्यांकनात चौकशीची प्रासंगिकता आणि विशिष्टतेचे उच्च मानक राखावेत.

# भारतीय अर्थव्यवस्था जागतिक विकासाचे प्रमुख इंजिन

**मुंबई :** मजबूत आर्थिक मूलभूत तत्त्वे आणि विवेकी धोरणांच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक विकासाचे प्रमुख इंजिन आहे, असे रिझर्व्ह बँकेने सोमवारी म्हटले आहे. आरबीआयच्या द्वैवार्षिक वित्तीय स्थिरता अहवालात (एफएसआर) असेही म्हटले आहे की, वाढत्या आर्थिक आणि व्यापार धोरण अनिश्चितता जागतिक अर्थव्यवस्थेच्या आणि वित्तीय व्यवस्थेच्या लवचिकतेची परीक्षा घेत आहेत. बदलत्या धोरणांमुळे आणि भू-राजकीय वातावरणामुळे वित्तीय बाजारपेठा, विशेषतः मुख्य सरकारी रोखे बाजार अस्थिर राहतात.



आरबीआयचा द्वैवार्षिक वित्तीय स्थिरता अहवाल

त्याचबरोबर, वाढती सार्वजनिक कर्ज पातळी आणि वाढलेली मालमत्ता मूल्यांकने यासारख्या विद्यमान असुरक्षिततेमध्ये नवीन धक्के वाढण्याची क्षमता आहे, असे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ने म्हटले आहे.

# अर्थमंत्री सीतारामन ब्रिक्स बैठकीला उपस्थित राहणार

**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या नेतृत्वाखाली भारतीय शिष्टमंडळ ब्रिक्स अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नर्स बैठक (एफएमसीबीजी) यासह विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी पाच दिवसांच्या अधिकृत विदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्या स्पेन, पोर्तुगाल आणि ब्राझील या तीन देशांचा दौरा करणार आहेत. अर्थमंत्री आज रात्री निघणार आहेत आणि ५ जुलै रोजी त्यांचा तीन देशांचा दौरा संपेल.

स्पेनमधील सेव्हिल येथील त्यांच्या दौऱ्याचा एक भाग म्हणून, अर्थमंत्री संयुक्त राष्ट्रांनी आयोजित केलेल्या फायनान्सिंग फॉर डेव्हलपमेंट अर्थात विकासासाठी वित्तपुरवठा (एफएफडी४) या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होतील आणि भारताच्या वतीने निवेदन करतील.

त्या सेव्हिल येथे 'एफएफडी४ परिणाम ते अंमलबजावणी : शाश्वत विकासासाठी खासगी भांडवलाची क्षमता अनलॉक करणे' या विषयावरील आंतरराष्ट्रीय व्यवसाय मंच नेतृत्व शिखर परिषदेत सहभागी होतील आणि मुख्य भाषण देतील, असे अर्थ मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

एफएफडी४ च्या निमित्ताने, त्या जर्मनी, पेरू आणि न्यूझीलंडमधील वरिष्ठ मंत्र्यांना आणि युरोपियन गुंतवणूक बँकेच्या (ईआयबी) अध्यक्षांना भेटतील. दौऱ्याच्या पुढील टप्प्यात अर्थमंत्री सीतारामन पोर्तुगालमधील लिस्बनला भेट देऊन पोर्तुगालच्या अर्थमंत्र्यांशी द्विपक्षीय बैठक घेण्याची अपेक्षा आहे. त्याशिवाय, त्या प्रमुख गुंतवणूकदार आणि अनिवासी भारतीयांशी संवाद साधतील.



ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे अर्थमंत्री न्यू डेव्हलपमेंट बँकेच्या (एनडीबी) १० व्या वार्षिक बैठकीला संबोधित करतील आणि ब्रिक्स अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नर्स बैठकीला (एफएमसीबीजी) देखील उपस्थित राहतील, असे त्यात म्हटले आहे.

एनडीबी बैठकींचा एक भाग म्हणून, सीतारामन 'ग्लोबल साऊथ'साठी एक 'प्रमुख बहुपक्षीय विकास बँक तयार करणे' या विषयावरील एनडीबी गव्हर्नर्स सेमिनारमध्ये भाषण देखील देतील. एनडीबी बैठकींच्या बाजूला सीतारामन ब्राझील, चीन, इंडोनेशिया आणि रशियामधील त्यांच्या समकक्षांशी द्विपक्षीय बैठका घेतील. ब्रिक्स हा पाच प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा -ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समूह आहे

## गुंतवणूक, चलन आणि ठेवींचा लाभ : आरबीआय

# भारताची विदेशातील वित्तीय मालमत्ता वधारली

**नवी दिल्ली :** भारताच्या देशातील वित्तीय मालमत्तेत २०२४-२५ या आर्थिक वर्षात मोठी वाढ झाली आहे. प्रामुख्याने विदेशातील उच्च थेट गुंतवणूक, चलन आणि ठेवी आणि राखीव मालमत्तांमुळे ही वाढ झाल्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय)ने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत म्हटले आहे.

आकडेवारीवरून दिसून आले की, भारताच्या परदेशातील वित्तीय मालमत्तेत ७२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ या तीन घटकांमधून झाली आहे. त्यामध्ये केवळ राखीव मालमत्तांचा वाटा ५४ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. भारतीय रहिवाशांच्या विदेशातील मालमत्तेत एकूण वाढ होण्यास थेट गुंतवणुकीसह चलन आणि ठेवींनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

आरबीआयने म्हटले आहे की, भारताच्या परदेशातील वित्तीय मालमत्तेत ७२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ ही परदेशातील थेट गुंतवणूक, चलन आणि ठेवींमध्ये वाढ झाल्यामुळे झाली आहे. २०२४-२५ दरम्यान, भारताच्या एकूण बाह्य वित्तीय मालमत्तेत १०५.४ अब्ज डॉलरची वाढ झाली. त्या तुलनेत, त्याच्या बाह्य आर्थिक देणींमध्ये ७४.२ अब्ज डॉलरची वाढ झाली. परिणामी, वर्षभरात अनिवासी लोकांचे भारतावरील निव्वळ दावे ३१.२ अब्ज डॉलरने कमी झाले. आरबीआयच्या अहवालात नमूद केले की, निव्वळ दाव्यांमध्ये ही घट प्रामुख्याने जानेवारी-मार्च २०२५ च्या तिमाहीत भारतातील विदेशी मालकीच्या मालमत्तेत (२५.८ अब्ज डॉलर) वाढ झालेल्या भारतीय रहिवाशांच्या परदेशी वित्तीय मालमत्तेत (६०.० अब्ज डॉलर) वाढ झाल्यामुळे झाली.

### ७२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ



भारताच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय मालमत्तेचे आंतरराष्ट्रीय वित्तीय देणींशी असलेले गुणोत्तर मार्च २०२५ मध्ये ७७.५ टक्क्यांपर्यंत वाढले, जे एका वर्षापूर्वी ७४.१ टक्के होते. हे देशासाठी मजबूत बाह्य आर्थिक स्थिती दर्शवते.

दायित्वाच्या बाबतीत, आवक थेट गुंतवणूक, कर्जे आणि चलन आणि ठेवींनी मोठी भूमिका बजावली. खरं तर, जानेवारी-मार्च २०२५ या कालावधीत भारतीय रहिवाशांच्या परदेशी देणींमध्ये झालेल्या वाढीच्या तीन-चतुर्थांश पेक्षा जास्त थेट गुंतवणूक आणि कर्जे होती. या तिमाहीत कर्जे १०.० अब्ज अमेरिकन डॉलरने वाढली, तर थेट गुंतवणूक ९.७ अब्ज अमेरिकन डॉलरने वाढली.

एकूणच, आकडेवारीनुसार परदेशात मजबूत मालमत्ता निर्मिती आणि दायित्वांमध्ये मध्यम वाढ यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक स्थितीत चांगली सुधारणा दिसून आली आहे.



# सेना आता प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राहिलेली नाही

## डॉ. श्रीकांत शिंदे यांचा हल्लाबोल : पालिका निवडणुकीत महायुतीच विजयी होईल!



**एस. बालकृष्णन/ आफ्रिदा रहमान अली**

**मुंबई** : शिवसेना ही आता प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राहिलेली नसल्याचे ठणकावतानाच आगामी पालिका निवडणुकांत महायुतीच विजयी होईल, असा विश्वास शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

दैनिक 'नवशक्ति' - 'द फ्री प्रेस जर्नल'च्या लीडर्स लाऊंज या मुलाखत मालिकेच्या पहिल्या भागात ते बोलत होते. यावेळी त्यांनी राजकारण, आंतरराष्ट्रीय संबंध, महाराष्ट्राचा विकास अशा विविध विषयांवर मोकळेपणाने मत मांडले. त्यांच्याशी झालेला हा सवाल-जबाब.

**सेनेतील फाटाफुट आणि एकनाथ शिंदे यांची भूमिका**

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून बंडखोरी केली हे एक धाडसी पाऊल होते. हे सत्तेसाठी उचललेले पाऊल नव्हते. तसेच त्यांना कधीही मुख्यमंत्री व्हायचे नव्हते.

**राहुल गांधी आणि परकीय प्रभाव**

राहुल गांधी यांनी जॉर्ज सोरोस यांच्या प्रभावातून बाहेर यावे. पाकिस्तान राहुल गांधींच्या विधानांचा हत्यार म्हणून वापर करत आहे.

**शिवसेनेचे भवितव्य**

शिवसेना ही आता कोणाचीही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राहिलेली नाही. आमच्याकडे कुठलाही नंबर १ किंवा नंबर २ नाही. प्रत्येक कार्यकर्ता हा आपल्यातील गुणवत्तेवर पुढे येऊ शकतो. आम्ही घराणेशाही मानत नाही. राजाचा मुलगाच राजा होईल, असेही आम्ही मानत नाही. काम आणि संघटन बांधणी महत्त्वाची आहे.

**पालिका निवडणुका**

आगामी पालिका निवडणुकांत महायुती एकत्र लढेल आणि विजय मिळवेल.

**डॉक्टर ते राजकारण**

अस्थीरोग तज्ज्ञ असलो तरी मला मुळात राजकारणात यायचे नव्हते. परंतु पक्षाला तरुण, शिकलेला चेहरा हवा होता. डॉक्टरकी आणि राजकारण हे दोन्ही पूर्ण वेळ देण्याचे काम आहे. मी मोठ्या प्रमाणावर लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणाची वाट निवडली आहे.

**आंतरराष्ट्रीय संबंध**

दहशतवाद ही फक्त भारताची समस्या नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जागतिक दौऱ्यांत पाकिस्तानच्या प्रॉक्सी वॉर धोरणाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्दाफाश झालाय. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनिर यांच्या व्हाईट हाऊस भेटीबद्दल विचारल्यावर, डॉ. शिंदे म्हणाले की, राष्ट्र स्वतःच्या हितासाठीचे निर्णय घेते... पण जगाने ९/११ चा हल्ला विसरू नये आणि ओसामा बिन लादेन कुठे सापडला हे लक्षात ठेवावे.

**दिशा सालियन प्रकरण** : दिशा सालियन प्रकरण संवेदनशील असून न्यायप्रक्रियेत आहे. याबाबतीत सत्य हळूहळू समोर येईल. न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

**राज्याची अर्थव्यवस्था**

राज्याचे कर्ज वाढत असतानाही, महाराष्ट्राचे १ लाख कोटींचे अर्थव्यवस्था व्हिजन अबाधित आहे.

## निवडक

### '१.५ लाख गोविंदांना विमा संरक्षण'

**मुंबई** : यंदा गोकुळाष्टमीच्या पार्श्वभूमीवर गोविंदा उत्सव सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी शासनाने राज्यातील १.५ लाख गोविंदांना विमा संरक्षण मिळावे, अशी विनंती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली असून लवकरच याबाबत शासनाकडून निर्णय जाहीर होईल अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिली.

गोविंदा खेळताना होणाऱ्या अपघातांमध्ये अनेकांना गंभीर दुखापती होतात. या पार्श्वभूमीवर, गोविंदा पथकातील खेळाडूंना औषधोपचार व विमा संरक्षण मिळावे यासाठी युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी राज्य शासनाने विमा संरक्षणाच्या माध्यमातून आर्थिक मदत करावी, अशी मागणी केली होती.

# तलावांत ४० टक्के जलसाठा

## मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलाव क्षेत्रात पावसाची हजेरी

**मुंबई** : गेल्या महिनाभरात मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलाव क्षेत्रामध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या मुंबईला पाणीपुरवठा करणारे तलाव ४० टक्के भरले आहेत. मुंबईला दरवर्षी एकूण १४.४७ लाख दशलक्ष लिटर पाण्याची गरज असते. सध्या तलावांत ५,८२,१७५ दशलक्ष लिटर पाणीसाठा झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांतील पाणीपातळीत चांगलीच वाढ झाली आहे. मुंबईला सर्वाधिक पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा तलावात २,४४,४३९ दशलक्ष पाणी साचले आहे. म्हणजेच भातसा तलावात सध्या ३४ टक्के पाणीसाठा साठला आहे. तर, तानसा आणि मध्य वैतरणा तलावांमध्येही समाधानकारक वाढ झाली आहे. तानसा तलावात ६१,७०७ दशलक्ष लिटर साठा असून, हा तलाव ४२.५३ टक्के भरला आहे. तसेच मध्य वैतरणा तलाव ४३.२८ टक्के भरला आहे. अप्पर वैतरणा, तानसा, मोडक सागर आणि मध्य वैतरणा या चार तलावांतील एकूण पाण्याचा साठा आता ३,२२, ९०६ दशलक्ष लिटर झाला आहे.



| तलाव | पाणीसाठा (द. लि.) | पडलेला पाऊस मिमी |
|---|---|---|
| अप्पर वैतरणा | १०८४८६ | २८.०० |
| मोडक सागर | ६८९५५ | २०. ०० |
| तानसा | ६१७०७ | १३.०० |
| मध्य वैतरणा | ८३७५७ | २६.०० |
| भातसा | २४४३३९ | २१.०० |
| विहार | ११६९१ | ३.०० |
| तुळशी | ३२३८ | १०.०० |
| | एकूण | ५८२१७५ द. लि. |

**असा होतो मुंबईला पाणीपुरवठा**

मुंबईला अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात जलाशयांमधून दररोज पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. दहिसर चेकनाक्यापासून वांद्रेपर्यंतची पश्चिम उपनगरे आणि माहीम ते मलबार हिलपर्यंतच्या शहराच्या पश्चिम भागाला मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा आणि तानसा या जलाशयांमधून पाणी मिळते. तर पूर्व उपनगरे आणि शहराच्या पूर्व भागाला भातसा, विहार आणि तुळशी या तलावांतून पाणीपुरवठा केला जातो. येथून येणारे पाणी पांजरपोळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते आणि मुलुंड चेकनाक्यापासून शीवपर्यंतची पूर्व उपनगरे तसेच माझगावपर्यंतच्या शहराच्या पूर्व भागात वितरीत केले जाते.

# पीओपीच्या मोठ्या मूर्तींबाबत विसर्जन धोरण ठरेना

## सरकारला २३ जुलैपर्यंत मुदतवाढ



**मुंबई** : पीओपीच्या मूर्त्या आणि शाडू मातीच्या मूर्तीचा वाद सुरू असताना पीओपी मूर्ती घडवण्यावर आणि त्याची विक्री करण्यावर बंदी उठविली असली जरी मोठ्या आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठ्या मूर्ती विसर्जनाच्या मुद्द्याबाबत राज्य सरकारला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणखी तीन आठवड्यांची मुदत उच्च न्यायालयाने दिली. मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने धोरण निश्चित करण्यासाठी मुदतवाढ देताना याचिकेची सुनावणी २३ जुलैपर्यंत तहकूब ठेवली.

सीपीसीबीच्या सूचनेनुसार मुंबई उच्च न्यायालयाने राज्यात लागू केलेल्या पीओपी बंदीला काही मूर्तिकार संटनांनी उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मागील सुनावणीच्यावेळी खंडपीठाने मूर्ती बनवण्यास आणि विक्री करण्यास घातलेली बंदी उठविली. मात्र या मूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जनला असलेली बंदी कायम ठेवली. तसेच समुद्रासारख्या नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये मोठ्या मूर्तीचे विसर्जन न करण्याबाबत सरकार स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आखणार आहे का?, अशी विचारणा न्यायालयाने केली होती. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ज्ञ समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मूर्ती विसर्जनाच्या मुद्द्याबाबत सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र सुनावणीच्यावेळी राज्य सरकारचे धोरण निश्चित झालेले नसल्याने राज्य सरकारने आणखी तीन आठवड्यांची मुदतवाढ देण्याची विनंती केली. ती खंडपीठाने मान्य करत याचिकेची सुनावणी २३ जुलैला निश्चित केली.

# शालेय बसमालकांचा उद्यापासून संप



**ई-चलन जारी केल्याचा निषेध; विद्यार्थी आणि पालकांची होणार गैरसोय**

**मुंबई** : वाहतूक पोलीस आणि सीसीटीव्ही देखरेख यंत्रणेकडून मनमानी पद्धतीने ई-चलन जारी केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र स्कूल बस ओनर्स असोसिएशनने २ जुलैपासून बेमुदत संपाची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांची मोठी गैरसोय होणार आहे.

परिवहन विभागाकडून अनेक वर्षे स्कूल बस मालकांना येणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. यासोबतच वाहतूक पोलिसांकडून बसचालकांवर अकारण कारवाई होत असल्याचा आरोप स्कूल बस ओनर्स असोसिएशनने केला आहे. तसेच शाळेच्या मुख्य द्वारावर बस विद्यार्थ्यांना नेत अथवा सोडत असताना पोलिसांकडूनही कारवाई करण्यात येत आहे. याचा निषेध स्कूल बस ऑनर्स असोसिएशनकडून होत आहे.

शाळांजवळील कर्तव्याशी संबंधित थांब्यांसाठी स्कूल बसेसविरुद्ध जारी केलेले सर्व प्रलंबित ई-चलन त्वरित माफ करावे, सर्व मान्यताप्राप्त शाळा बस चालकांना ओळखपत्र देण्यात यावे, शाळा बस वाहनांवरील नियमांचे पालन करणाऱ्या वाहनांवर कोणताही अन्यायकारक दंड लावू नये, दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी सरकार, आरटीओ, पोलीस आणि वाहतूक संघटनांसह संयुक्त टास्क फोर्सची स्थापना करावी, अशा विविध मागण्या असोसिएशनने केल्या आहेत.

### माल व प्रवासी वाहन मालकांचा आजपासून बंद

माल व प्रवासी वाहन चालकांकडून जबरदस्तीने दंडवसुली करणे, ई-चलनाच्या नावाखाली आर्थिक लूट होणे यासह प्रलंबित मागण्या मान्य न केल्याने १ जुलैपासून अनिश्चित काळापर्यंत संपाचा इशारा महाराष्ट्र राज्य वाहन चालक-मालक व प्रतिनिधी महासंघाने दिला आहे. यामुळे राज्यातील मालवाहतूक ठप्प होण्याची शक्यता आहे.

> शालेय वाहतुकीसंदर्भातील अनेक समस्यांकडे शासनाचे व वाहतूक खात्याचे दुर्लक्ष होत आहे. राज्य सरकारने मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास २ जुलैपासून राज्यभर स्कूल बस सेवा बंद ठेवू.
>
> – **अनिल गर्ग**, अध्यक्ष, स्कूल बस ऑनर्स असोसिएशन

# श्री हिंगळादेवीचा आज द्विवार्षिक गोंधळ उत्सव

**मुंबई** : वेसावा कोळीवाड्याचे ग्रामदैवत श्री हिंगळादेवी मातेचा द्विवार्षिक गोंधळ उत्सव १ जुलै २०२५ रोजी साजरा होणार आहे. कोळी, आगरी, भंडारी व समुद्रकिनारी राहणाऱ्या जमातींच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेले वेसाव्याच्या पाटील गल्लीत श्री हिंगळादेवीचे मंदिर हे जागृत आणि ग्रामसंरक्षक शक्तीचे प्रतीक आहे. हिंगळा देवी मंदिराची निगराणी पारंपरिक पूजा विधी आणि संपूर्ण व्यवस्थापन वेसाव कोळी जमात या विश्वस्त संस्थेच्या वतीने करण्यात येते.



दर दोन वर्षांनी येणाऱ्या या गोंधळ उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सायंकाळी पूजा झाल्यावर मंदिरातून वारीचे पवित्र अग्निकुंडासह प्रस्थान होते. कोळी महिलांचा मानपान आणि पारंपरिक वेशात नृत्याविष्कार होतो. नाच, ढोल, ताशा, लेझीम यांच्या गजरात उत्सवाचा जल्लोष करण्यात येतो. रात्री वारीची गावातून प्रदक्षिणा घालण्यात येते. यावेळी मोठ्या संख्येने भाविक वारीत सहभागी होतात आणि हिंगळादेवीचे दर्शन घेतात. गावातील बँड पथकासह वाजतगाजत वारी निघते, अशी माहिती वेसावा कोळी जमात ट्रस्टच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष हरेश्वर घुस्ते व सचिव महेंद्र फोका यांनी दिली.

हा गोंधळ म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही, तर गावाचे संरक्षण आणि समुद्रकिनाऱ्यावरील जीवनाच्या सुरळीततेसाठी देवीला केलेली प्रार्थना असल्याचे खजिनदार उत्कर्ष हिरे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे !

## कृषी दिनानिमित्त जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे आवाहन

**जळगाव ।** शेतकऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाची कास धरत शेतीत नवनवीन प्रयोग करून प्रयोगशीलता अंगीकारली पाहिजे. रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळावे आणि स्वतः निर्यातक्षम बनावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या शाहू महाराज सभागृहात आयोजित कृषी दिनाच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी, कृषी विकास अधिकारी पद्मनाभ म्हस्के, गट विकास अधिकारी श्वेता पालवे, आत्माराम जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांसह महिला बचत गट प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.



**मार्गदर्शन** करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, वसंतराव नाईक हे महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे नेतृत्व होते. त्यांनी राज्यात एमआयडीसीच्या माध्यमातून औद्योगिक विकास घडवून आणला. शेतीतील सुधारणा व हरित क्रांतीतही त्यांचा मोठा वाटा होता. जिल्हाधिकारी यांनी शेतीतील सध्याच्या समस्यांवर प्रकाश टाकताना घटती भूजल पातळी हा चिंतेचा विषय असल्याचे सांगितले. भूजल पातळी वाढवण्यासाठी जल पुनर्भरण उपक्रम अत्यंत गरजेचे असून, जिल्हा परिषदेने यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलल्याचे त्यांनी नमूद केले. जलतारा यासारखे उपक्रम शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले. पेरणीच्या वेळी आंतरपीक पद्धतीचा अवलंब, गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा वापर व रासायनिक खतांचा मर्यादित वापर यावर भर देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला वाढता प्रतिसाद

## पर्यावरणस्नेहींनी गाठला ५ लाखांचा टप्पा

**मुंबई** : वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवारपर्यंत सहभागी ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केल आहे. 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे.

**१ लाख ४० हजार वारकऱ्यांना थेट लाभ**

# वारकऱ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी 'चरण सेवा'

**मुंबई** : आषाढी वारीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील लाखो वारकरी पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. कधी ऊन तर कधी पाऊस अशा थकवणाऱ्या प्रवासात त्यांच्या पायांना विश्रांती आणि आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'चरणसेवा' उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून आतापर्यंत १ लाख ४३ हजार वारकऱ्यांना थेट सेवा मिळाली असून, १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृती पोहोचली आहे.

या उपक्रमात राज्यभरातील ९ हजार ४७५ वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, पॅरामेडिकल विद्यार्थी, नर्सिंग व फिजिओथेरपी महाविद्यालयांचे प्राध्यापक आणि सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. याशिवाय, सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, जालना, बीड आणि धाराशिव या सात जिल्ह्यांचा सक्रिय सहभाग लाभलेला आहे. या सेवेचा फायदा पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांना होत आहे.



### रथाच्या माध्यमातून आरोग्य जनजागृती!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून चरण सेवा उपक्रम सुरू आहे. या सेवेचा लाभ घेणाऱ्या वारकऱ्यांसोबतच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. चरणसेवेसोबत केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांची माहिती आरोग्य जनजागृती रथाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवली जात आहे.

### योगसत्रे आणि सांस्कृतिक सहभाग

वारकऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी सात ठिकाणी योग वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. वारकऱ्यांच्या सेवेसोबत आरोग्याचे महत्त्व पटवून देणारा हा उपक्रम आदर्श ठरत आहे. तसेच पालखी मार्गावर रुग्णवाहिका तैनात करण्यात आलेल्या आहेत.

### ३३७ ठिकाणी वैद्यकीय सेवा आणि चरण सेवा!

'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या संकल्पनेतून पालखी मार्गावरील ११६ विश्रांती व मुक्कामाच्या ठिकाणी तर, पालखी मार्गावरील २२१ आपला दवाखान्यांमधून चरणसेवा व आरोग्य सुविधा पुरवण्यात येत आहेत. या उपक्रमात २१९ आरोग्य संस्थांचा समावेश आहे. वारकऱ्यांच्या पायांची मालिश करण्यासाठी २ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाचे उत्पादन करण्यात आले आहे.

आपला आवाज, आपली शक्ती जनशक्ति
संस्थापक – स्व. ब्रिजलालभाऊ पाटील
संस्थापक संपादक – स्व. कुंदनदादा दत्तात्रय ढाके

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक **योगेश्वर दत्तात्रय ढाके** यांनी भास्कर प्रिंटींग प्रेस, गट नं. २३८/२, कासट कम्पाउंड, पाळधी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथे मुद्रीत करुन ३, दुसरा माळा, रायसोनी चेंबर्स, चित्रा चौक, नवी पेठ,जळगाव–४२५००१(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ संपादक – **त्र्यंबक केदूजी कापडे*** » (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) ई–मेल – **jalgaon@janashakti.in** **स्थापना** : १९५६
**संपर्क** : संपादकीय – ९८२३४४८५४४, व्यवस्थापकीय – ९५४५४७९९८९.